RNI No. MAHBIL /2009/31747

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक-ल

वर्ष १२, अंक २५(२)] गुरुवार, एप्रिल ३०, २०२६/वैशाख १०, शके १९४८ [पृष्ठे २७१, किंमत : रुपये १६.००

असाधारण क्रमांक ४९

प्राधिकृत प्रकाशन

(केंद्रीय) औद्योगिक विवाद अधिनियम व मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम यांखालील (भाग एक, चार-अ, चार-ब आणि चार-क यांमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना, आदेश व निवाडे यांव्यतिरिक्त) अधिसूचना, आदेश व निवाडे.

उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० एप्रिल २०२६.

अधिसूचना

व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कामाची स्थिती संहिता, २०२०.

क्रमांकः- संकीर्ण-१०२६/प्र.क्र.१४/काम-१०.—व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कामाची स्थिती संहिता, (२०२० चा ३७) याच्या कलम १३३ व कलम १३५ याद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून आणि त्याबाबतीत त्यास प्राधिकृत करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, आणि श्रमिक पत्रकार (सेवाशर्ती) अधिनियम, १९५५ (१९५५ चा ४५) या अन्वये केलेल्या श्रमिक पत्रकार (सेवाशर्ती) आणि संकीर्ण तरतुदी नियम, १९५७; मोटार वाहतूक कामगार अधिनियम,१९६१ (१९६१ चा २७) या अन्वये केलेल्या मोटार वाहतूक कामगार नियम, १९६२; बिडी व सिगार कामगार (रोजगाराच्या शर्ती) अधिनियम, १९६६ (१९६६ चा ६३) या अन्वये केलेल्या बिडी व सिगार कामगार (रोजगाराच्या शर्ती) नियम, १९६८; कंत्राटी कामगार (विनियमन व निर्मूलन) अधिनियम, १९७० (१९७० चा ३७) या अन्वये केलेल्या कंत्राटी कामगार (विनियमन व निर्मूलन) केंद्रीय नियम, १९७१; विक्री संवर्धन कर्मचारी (सेवाशर्ती) अधिनियम, १९७६(१९७६ चा ११) या अन्वये केलेल्या विक्री संवर्धन कर्मचारी (सेवाशर्ती) नियम, १९७६; आंतरराज्य स्थलांतरित कामगार (रोजगाराचे विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम,१९७९ (१९७९ चा ३०) या अन्वये केलेल्या आंतरराज्य स्थलांतरित कामगार (रोजगाराचे विनियमन व सेवाशर्ती) केंद्रीय नियम, १९७९; चित्रपट कामगार व चित्रपट रंगभूमी कामगार (रोजगाराचे विनियमन) अधिनियम, १९८१ (१९८१ चा ५०) या अन्वये केलेल्या चित्रपट कामगार व चित्रपट रंगभूमी कामगार (रोजगाराचे विनियमन) नियम, १९८४ आणि इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगाराचे विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ (१९९६ चा २७) या अन्वये केलेल्या इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगाराचे विनियमन व सेवाशर्ती) नियम, १९९८, यांचे अधिक्रमण करून त्याद्वारे बाधित होण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी. उक्त संहितेच्या कलम १३३ च्या पोट-कलम (१) व कलम १३५ च्या पोट-कलम (१) यांद्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहेत; आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे की,

Part I-L Ext. No. 49.indd — 1

महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये ही मसुदा अधिसूचना प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवस समाप्त झाल्यानंतर, उक्त प्रारूप, महाराष्ट्र शासनाकडून विचारात घेण्यात येईल.

२. वर नमूद केलेला कालावधी संपण्यापूर्वी, उक्त प्रारुपाच्या बाबतीत कोणत्याही व्यक्तीकडून कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, कामगार भवन, इ ब्लॉक, बांद्रा-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१ यांना किंवा mh.labourcodes.rules@gmail.com, या ई मेल वर प्राप्त होतील असे कोणतेही आक्षेप किंवा सूचना, शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

प्रारुप नियम

प्रकरण - एक

प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव.-

या नियमांस, महाराष्ट्र व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कामाची स्थिती (कामगार) नियम, २०२६ असे म्हणावे.

२. व्याख्या.-

(१) या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,-

(क) "अपिलीय अधिकारी" याच अर्थ, कलम ४ अन्वये महाराष्ट्र शासनाने अधिसूचित केलेला अधिकारी, असा आहे;

(ख) "मंडळ" याचा अर्थ,संहितेच्या कलम १७ अन्वये गठीत केलेले महाराष्ट्र व्यावसायिक सुरक्षा व आरोग्य सल्लागार मंडळ, असा आहे;

(ग) "केंद्रीय कामगार संहिता" याचा अर्थ, व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कामाची स्थिती संहिता, २०२०; सामाजिक सुरक्षा संहिता,२०२०; औद्योगिक संबंध संहिता, २०२० व वेतन संहिता, २०१९, असा आहे;

(घ) "संहिता" याचा अर्थ, व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कामाची स्थिती संहिता, २०२० (२०२० चा २७), असा आहे;

(ङ) “कुटुंब” ही संज्ञा, जेव्हा कामगारांच्या संबंधात वापरली जाते तेव्हा, कुटुंब याचा अर्थ,-

(एक) वैवाहीक जोडीदार;

(दोन) जी कामगारावर अवलंबून आहेत आणि ज्यांची वयाची अठरा वर्षे पूर्ण झालेली नाहीत अशी कामगाराच्या दत्तक मुलांसह अन्य मुले; आणि

(तीन) अशा कामगारावर अवलंबून असलेले त्याचे आजी-आजोबा, आई-वडील (महिला कामगाराचे सासू व सासरे यांसह) विधवा मुलगी व विधवा बहीण,

असा आहे.

स्पष्टीकरण.- या खंडाच्या प्रयोजनार्थ, जे अवलंबित त्या त्या वेळी सर्व स्रोतांमधून दरवर्षी रुपये पाच लाख रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न मिळवतात असे अवलंबित, कुटुंबाच्या व्याख्येमधून वगळण्यात येतील.

(चार) कोणत्याही शारीरिक किंवा मानसिक अपसामान्यतेच्या किंवा इजा या कारणावरून विकलांग झाली असेल किंवा विकलांगता चालू राहील तोपर्यंत कामगाराच्या मिळकतीवर पूर्णपणे अवलंबित असलेले एखादे बालक;

(च) "नमुने" याचा अर्थ, या नियमांस जोडलेले नमुने, असा आहे;

(छ) "शासन" किंवा "राज्य शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे;

(ज) "व्यवस्थापक" याचा अर्थ, या संहितेच्या प्रयोजनार्थ, आस्थापनेच्या कामाकरिता नियोक्त्यास किंवा भोगवटादारास जबाबदार असलेली व्यक्ती, असा आहे;

(झ) "पोर्टल" याचा अर्थ,राज्य शासनाचे पोर्टल, असा आहे;

(त्र) "तिमाही" याचा अर्थ, १ जानेवारी, १ एप्रिल, १ जुलै किंवा १ ऑक्टोबर रोजी सुरू होणारा लागोपाठच्या तीन महिन्यांचा कालावधी, असा आहे;

(ट) "नोंदणी अधिकारी" याचा अर्थ,या नियमांच्या प्रयोजनार्थ, राज्याद्वारे कामगार आयुक्तालयाच्या अधिपत्याखाली नोंदणी अधिकारी म्हणून नियुक्त केलेला अधिकारी,असा आहे;

(ठ) "कलम" याचा अर्थ, संहितेचे कलम, असा आहे;

(ड) "वर्ष" याचा अर्थ, कोणत्याही वर्षांमधील १ जानेवारीपासून सुरू होणारा बारा महिन्यांचा कालावधी,असा आहे.

(२) या नियमांमध्ये वापरलेले आणि व्याख्येत नमूद न केलेले, परंतु संहितेमध्ये व्याख्या केलेले शब्द व संज्ञा यांना, संहितेमध्ये अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच अर्थ असतील.

प्रकरण-दोन

नोंदणी

३. कलम ३ अन्वये नोंदणीसाठी अर्ज.-

(१) (एक) यापूर्वी नोंदणी न केलेले इमारत व इतर बांधकाम कामगार आस्थापना,चित्रपट कामगार (दृकश्राव्य कार्य), मोटार वाहतूक कामगार, रोप मळा, कंत्राटी कामगार आणि अन्य कोणतीही आस्थापना (कारखाना, खनिकर्म आणि लहान बंदरे यांव्यतिरिक्त) यांची नोंदणी करण्याची मागणी करणारा नियोक्ता, नोंदणी करण्याची मागणी केलेली आस्थापना ज्या क्षेत्रामध्ये स्थित असेल त्या क्षेत्राच्या नोंदणी अधिकाऱ्याकडे उक्त नमुन्यामध्ये नमूद केल्यानुसार आस्थापनेचा संपूर्ण तपशील आणि आस्थापनेच्या नोंदणीशी संबंधित कागदपत्रे, नियोक्ताच्या (नियोक्त्यांच्या) ओळखपत्राचा पुरावा आणि नियोक्त्याचा (नियोक्त्यांच्या) पत्ता इलेक्ट्रॉनिक स्वरूपात दाखल करील. उक्त नमुन्यावर पोर्टलवर डिजिटल पद्धतीने स्वाक्षरी करण्यात येईल. अर्जात सादर केलेल्या सर्व माहितीच्या सत्यतेकरिता अर्जदार जबाबदार असेल.

(दोन) प्रत्येक अर्जासोबत, आस्थापनेच्या मुख्य कार्यामध्ये कंत्राटी कामगार कामावर ठेवलेले नसल्याबद्दलच्या बाबीशी संबंधित असणारे नियोक्त्याने किंवा भोगवटादाराने किंवा मालकाने यथोचितरीत्या स्वाक्षरी केलेले आस्थापनेच्या नाममुद्रित पत्रावरील **जोडपत्र-अ** मधील हमीपत्र जोडण्यात येईल.

(तीन) नोंदणीच्या प्रत्येक ऑनलाइन अर्जासोबत,-

(क) जोडपत्र-ब मधील स्वयं- घोषणापत्र;

(ख) जोडपत्र-क मधील स्वयं- साक्षांकन घोषणापत्र,जोडण्यात येईल.

(चार) आयकर अधिनियम, १९६१ अन्वये नियत वाटप केलेला अर्जदाराचा स्थायी खाते क्रमांक (PAN) किंवा आस्थापनेचा कर वजावट खाते क्रमांक (TAN) अथवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये आस्थापनेला नियत वाटप केलेला अन्य कोणताही विशिष्ट क्रमांक किंवा नमुन्यामध्ये सादर केलेला इतर कोणताही तपशील, ऑनलाइन पद्धतीने तपासता येईल.

(२) नोंदणी शुल्क:- (एक) या नियमान्वये नोंदणी प्रमाणपत्र देण्यासाठी ई-पेमेंटद्वारे प्रदान करावयाचे शुल्क, पुढील तक्त्यामध्ये दिल्याप्रमाणे असेल:-

तक्ता

अ. क्र.	कोणत्याही एके दिवशी आस्थापनेमध्ये प्रस्तावित नियुक्त कर्मचाऱ्यांची संख्या	शुल्क
(१)	(२)	(३)
१	५० पर्यंत	रु.५००/-
२	५१ ते १००	रु.१,०००/-
३	१०१ ते ३००	रु.५,०००/-

४	३०१ व त्या वरील	रु.१०,०००/-

(दोन) विलंब शुल्क:- जेव्हा एखाद्या नियोक्त्याने, कलम ३ च्या पोट -कलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, नोंदणीसाठी ६० दिवसांच्या आत त्याचा अर्ज सादर केला नसेल तर त्या बाबतीत, तो, पुढील तक्त्यामध्ये दिल्याप्रमाणे विलंब शुल्कासह नोंदणीसाठी अर्ज सादर करील:-

तक्ता

अ. क्र.	विलंबाचा कालावधी	शुल्काची टक्केवारी
(१)	(२)	(३)
१	३० दिवसांपर्यंत	२५ %
२	६० दिवसांपर्यंत	५० %
३	९० दिवसांपर्यंत	७५ %
४	९१ दिवस व त्याहून अधिक	१०० %

(३) (एक) जर अर्ज सर्व बाबतीत परिपूर्ण असेल तर, तात्काळ, परंतु, असा परिपूर्ण अर्ज सादर केल्याच्या तारखेपासून सात कामकाजाच्या दिवसांपेक्षा विलंबाने नसेल अशा कालावधीत **नमुना-दोन** मध्ये इलेक्ट्रॉनिक स्वरूपात नोंदणी प्रमाणपत्र देण्यात येईल, त्यात कसूर केल्यास, अशा

आस्थापनेची नोंदणी करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि नोंदणी प्रमाणपत्र स्वयंचलितपणे निर्गमित करण्यात येईल:

परंतु, अपवादात्मक परिस्थितीत, राज्य शासन, अधिसूचनेद्वारे, अशा कालावधीसाठी त्यामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, राज्यातील संपूर्ण किंवा काही भागातील आस्थापना किंवा आस्थापना वर्ग याबाबतीत, इलेक्ट्रॉनिक नोंदणीची आवश्यकता शिथिल करू शकते आणि अशा प्रकारे तरतूद केलेल्या **नमुना-एक** मध्ये अर्ज करण्यास परवानगी देऊ शकते.

(दोन) नोंदणी प्रमाणपत्र हस्तांतरणयोग्य असणार नाही आणि नोंदणी प्रमाणपत्राची प्रत, आस्थापनेच्या आवारामध्ये इलेक्ट्रॉनिक स्वरूपात एखाद्या दर्शनी जागेवर आणि उपलब्ध असल्यास अधिकृत संकेतस्थळावर टाकण्यात येईल.

(४) संहितेखालील नोंदणी अधिकारी, पोट-नियम (१) च्या आवश्यकतांचे पालन करण्यास कसूर केलेल्या नियोक्त्यास निदेश देऊ शकेल, नियोक्ता अशा निदेशात नमूद केलेल्या मुदतीत, अशा आवश्यकतांचे पालन करील आणि असा नियोक्ता, त्यानंतर, अधिकाऱ्याने त्याबाबतीत, दिलेल्या निर्देशांचे पालन करील.

(५) आस्थापनेच्या नोंदणीवेळी अंमलात असलेल्या इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगाराचे विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम,१९९६, आंतरराज्य स्थलांतरित कामगार (रोजगाराचे विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९७९, बिडी व सिगारेट कामगार (रोजगाराचे विनियमन) अधिनियम, १९५६, मोटार वाहतूक कामगार अधिनियम, १९६१ व कंत्राटी कामगार (विनियमन व निर्मूलन) अधिनियम, १९७० या अन्वये आधीच नोंदणी केलेल्या आस्थापनेच्या बाबतीत, नियोक्ता, ज्या तारखेस नियम अंमलात आला असेल त्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत, नोंदणीकरिता इलेक्ट्रॉनिक स्वरूपात पोर्टलवर अर्ज सादर करील.

(६) नियोक्ता,संहितेच्या किंवा नियमांच्या किंवा विनियमांच्या, किंवा यथास्थिति, त्याखाली केलेल्या योजनेच्या संबंधात त्याने तयार केलेल्या किंवा पूर्ण केलेल्या सर्व दस्तऐवजांवर आणि संबंधित कार्यालयाशी केलेल्या सर्व पत्रव्यवहारांमध्ये नोंदणी क्रमांक नमूद करील.

(७) मालकी हक्कातील, व्यवस्थापनातील किंवा विनिर्दिष्ट केलेल्या पोर्टलवर सादर केलेल्या नोंदणी नमुन्यामध्ये भरलेल्या कोणत्याही तपशिलातील कोणताही बदल, असा बदल केल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, नियोक्त्याकडून पोर्टलवर अद्ययावत करण्यात येईल.

(८) ज्याला या संहितेच्या तरतुदी लागू होतात आणि ज्याची व्यावसायिक कार्ये बंद होण्याच्या प्रक्रियेत आहेत अशा आस्थापनेचा नियोक्ता, केंद्रीय कामगार संहिता आणि त्याखाली केलेले नियम या अन्वये प्रदेय असलेल्या सर्व देय रकमा प्रदान केल्याचा परिपूर्ण तपशील दिल्यानंतर, नोंदणी रद्द करण्यासाठी ऑनलाईन अर्ज करू शकेल:

परंतु, भोगवटादाराने, केंद्रीय कामगार संहितेन्वये किंवा नोंदणी रद्द करतेवेळी लागू असलेल्या या कायद्यानुसार अंमलात असलेल्या राज्य कामगार कायद्यान्वये सर्व वैधानिक विवरणे सादर केल्याशिवाय, सर्व वैधानिक देय रकमा प्रदान केल्याशिवाय आणि तशा अर्थाचे स्वयंप्रमाणपत्र अर्जासोबत सादर केल्याशिवाय, नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्याचा असा कोणताही अर्ज, दाखल करून घेण्यात येणार नाही.

(९) नोंदणी अधिकारी, ज्या आस्थापनेच्या संबंधात त्याच्याकडून नोंदणी प्रमाणपत्रे निर्गमित करण्यात आलेली असतील त्या आस्थापनेचा तपशील दर्शविणारी, आस्थापनेची नोंदवही **नमुना तीन** मध्ये इलेक्ट्रॉनिक स्वरूपात जतन करील.

(१०) कोणतीही नोंदणी चुकीची माहिती देऊन मिळविली असेल तर, ती रद्द करण्यास पात्र असेल परंतु, त्या आस्थापनेला नोंदणी प्रमाणपत्र रद्द का करू नये म्हणून, इलेक्ट्रॉनिक किंवा नोंदणीकृत डाकेने किंवा शीघ्र डाकेने कारणे दाखवा नोटीस देऊन ३० दिवसांच्या आत म्हणणे मांडण्याची संधी दिली जाईल.

४. कलम ५ अन्वये आस्थापना सुरू करण्याची व बंद करण्याची सूचना- नियोक्ता, आस्थापना सुरू करण्यात आल्यापासून तीस दिवसांच्या आत, ज्या क्षेत्रात प्रस्तावित आस्थापना किंवा यथास्थिती आहे त्या क्षेत्रातील अधिकारक्षेत्र असलेल्या निरीक्षक-सह-सुविधाकारास व काम सुरु करावयाचे आहे, प्रारंभ केल्याचा प्रत्यक्ष दिनांक, काम पूर्ण केल्याचा दिनांक आणि यथास्थिति आस्थापना बंद केल्याचा प्रत्यक्ष दिनांक **नमुना-चार** मध्ये इलेक्ट्रॉनिक स्वरूपात, कळवील आणि कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी संघटनेच्या (इ पी एफ ओ) व कर्मचारी राज्यविमा महामंडळाच्या (इ एस आय सी) आस्थापनामध्ये नोकरीस असलेल्या कामगारांना **नमुना-चार** मध्ये आपोआप (स्वयंचलितपणे) पाठवण्यात येईल.

प्रकरण-तीन

नियोक्ता व कर्मचारी यांची कर्तव्ये

५. कलम ६ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ग) खालील कर्मचाऱ्यांची वार्षिक आरोग्य तपासणी करणे. इमारत व इतर बांधकामविषयक काम, सिनेमा काम (दृक-श्राव्य कार्य),मोटार परिवहन काम, लागवड व बिडी व सिगार काम करणाऱ्या प्रत्येक आस्थापनेचा नियोक्ता कर्मचाऱ्याची नियुक्ती झाल्यापासून तीस दिवसांत आणि त्यानंतर दर वर्षी प्रत्येक कर्मचाऱ्यांची मोफत वैद्यकीय तपासणी करील. अनुक्रमे **नमुना-पाच** व **नमुना- सहा** मधील प्रपत्रानुसार अर्हताप्राप्त वैद्यकीय अधिकाऱ्यामार्फत वैद्यकीय तपासणी करण्यात येईल. अर्हताप्राप्त वैद्यकीय अधिकाऱ्याकडून संबंधित नियोक्त्यास वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करण्यात येईल, आणि जेव्हा मागणी करण्यात येईल तेव्हा, निरीक्षक-सह-सुविधाकारास ते सादर करण्यात येईल.

६. कलम ६ च्या पोट-कलम (१) च्या खंड (च) खालील कर्मचाऱ्याचे नियुक्तीचे पत्र.- कर्मचाऱ्याला, **नमुना-सात** मधील नियुक्तीपत्र देण्यात आल्याशिवाय, त्याला कोणत्याही आस्थापनेत कामावर ठेवण्यात येणार नाही:

परंतु, ज्या कर्मचाऱ्याला आवश्यक तपशील अंतर्भूत असणारे नियुक्तीपत्र देण्यात आलेले नाही त्या कर्मचाऱ्याला, हे नियम अंमलात आल्यापासून तीन महिन्यांच्या आत नियुक्तीपत्र देण्यात येईल.

७. कलम ११ व कलम १२ अन्वये अपघात व धोकादायक घटना व विवक्षित आजार याची सूचना आणि कलम १४ अन्वये उपचारात्मक कृती-

(१) कारखाना व लघु बंदरे वगळता, अन्य कोणत्याही आस्थापनेमध्ये कोणत्याही ठिकाणी, ज्याचे पर्यावसन कोणत्याही व्यक्तीच्या मृत्यूमध्ये झाले असेल असा अपघात, धोकादायक घटना घडली असेल व विवक्षित आजार असेल त्या बाबतीत, त्या आस्थापनेचा नियोक्ता किंवा भोगवटादार किंवा व्यवस्थापक, बारा तासांच्या आत, **नमुना-आठ** मधील त्याची सूचना इलेक्ट्रॉनिक स्वरूपात, मुख्य निरीक्षक-सह-सुविधाकारास व निरीक्षक-सह-सुविधाकारास आणि जिल्हादंडाधिकाऱ्यास किंवा उपविभागीय अधिकाऱ्यास व नजीकच्या पोलीस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्यास आणि जखमी झालेल्या किंवा मयत झालेल्या व्यक्तीच्या कुटुंबातील सदस्यांना किंवा नातेवाईकांना तात्काळ पाठवील आणि त्याची माहिती, दूरध्वनीद्वारे किंवा विशेष संदेश वाहकाद्वारे, इलेक्ट्रॉनिक मेलने (ई-मेलने) किंवा लघुसंदेश सेवेद्वारे (एसएमएस) देईल:

परंतु, जर अपघाताच्या किंवा धोकादायक घटनेच्या बाबतीत, आस्थापनेचा नियोक्ता किंवा भोगवटादार किंवा व्यवस्थापक यांच्याकडून नोटीस व अहवाल पाठवण्यात आल्यानंतर, अशा अपघातामुळे किंवा धोकादायक घटनेमुळे कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू घडून आला असेल तर, नियोक्ता किंवा भोगवटादार किंवा व्यवस्थापक प्राधिकाऱ्यांना तात्काळ नोटीस पाठवील आणि पुष्टी दिलेली ही माहिती, मृत्यू झाल्यापासून बारा तासांच्या आत, लेखी स्वरुपात कळवील.

(२) कारखाना व लघु बंदरे वगळता, अन्य कोणत्याही आस्थापनेमध्ये कोणत्याही ठिकाणी, ज्याचे पर्यावसन कोणत्याही व्यक्तीस शारीरिक इजा (प्राणघातक नसलेली) होण्यामध्ये झालेली असेल आणि त्या कारणामुळे इजा झालेल्या व्यक्तीस अपघात घडल्याच्या लगत नंतरच्या ४८ तासाच्या किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीकरिता काम करण्यास प्रतिबंध झाला असेल असा अपघात किंवा धोकादायक घटना घडली असेल त्या बाबतीत, त्या आस्थापनेचा नियोक्ता किंवा भोगवटादार किंवा

व्यवस्थापक, अठ्ठेचाळीस तास पूर्ण झाल्यानंतर बारा तासांच्या आत, **नमुना-आठ** मधील त्याची सूचना इलेक्ट्रॉनिक स्वरूपात, निरीक्षक-सह-सुविधाकारास तात्काळ पाठवील:

परंतु, जर वर निर्दिष्ट केलेल्या अठ्ठेचाळीस तासांसाठी किंवा त्याहून अधिक तासांसाठी काम करण्यापासून अक्षम ठरल्याचा कालावधी, अपघात, किंवा धोकादायक घटना घडल्याच्या लगतनंतर घडला नसेल, परंतु त्यानंतर एकापेक्षा अधिकवेळा अक्षमता घडली असेल तर, जेव्हा अपघातामुळे किंवा धोकादायक घटनेमुळे काम करण्यापासून अक्षम ठरल्याचा प्रत्यक्ष एकूण कालावधी बारा तास इतका असेल तेव्हा, त्या वेळेपासून चोवीस तासांच्या आत, विनिर्दिष्ट केलेला अहवाल, **नमुना-आठ** मध्ये निरीक्षक-सह-सुविधाकारास पाठविण्यात येईल.

(३) कलम १४ अन्वये कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेस व आरोग्यास नजीकच्या काळात धोका अस्तित्वात असल्यासंबंधी कर्मचाऱ्याकडून माहिती मिळाल्यावर, आस्थापनेचा नियोक्ता किंवा भोगवटादार किंवा व्यवस्थापक, या संबंधात तात्काळ उपयोजनात्मक कारवाई करील. आस्थापनेचा नियोक्ता किंवा भोगवटादार किंवा व्यवस्थापक,मग त्याची खात्री पटलेली असो किंवा नसो, केलेल्या अशा कारवाईचा अहवाल, इलेक्ट्रॉनिक स्वरूपात किंवा नोंदणीकृत डाकेने किंवा शीघ्र डाकेने तात्काळ निरीक्षक-सह-सुविधाकारास पाठवील.

(४) (एक) ज्या ठिकाणी संहितेच्या तिसऱ्या अनुसूची खालील अधिसूचित केलेला कोणताही रोग आढळल्यास, आस्थापनेचा नियोक्ता किंवा भोगवटादार किंवा व्यवस्थापकाद्वारे निरीक्षक-सह-सुविधाकारास किंवा मुख्य निरीक्षक-सह-सुविधाकारास

पुढील नमुन्यातील नोटीस इलेक्ट्रॉनिक स्वरूपात पाठविण्यात येईल.

रोगाची नोटीस

१. नियोक्ता किंवा भोगवटादार किंवा व्यवस्थापकाचे नाव व पत्ता

२. आस्थापनेचे नाव व पत्ता

३. आस्थापनेचे स्वरूप:

४. रुग्णाचा तपशील:

(क) रुग्णाचे नाव:

(ख) रुग्णाचा कामगार क्रमांक:

(ग) रुग्णाचा पत्ता:

(घ) रुग्णाचा नेमका व्यवसाय:

५. ज्या रोगाने रुग्ण पीडित झाला आहे त्या रोगाचे नाव:

६. रोगनिदान झाल्याचा दिनांक:

७. वैद्यक व्यवसायीचा तपशील:

८. हे प्रकरण वैद्यकीय अधिकाऱ्याला कळविण्यात आले आहे का:

दिनांक:_____नियोक्ता किंवा भोगवटादार किंवा व्यवस्थापकाची स्वाक्षरी.

(दोन) जर कोणताही अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायी एखाद्या अशा व्यक्तीवर उपचार करत असेल जी एखाद्या आस्थापनेत कार्यरत आहे किंवा पूर्वी कार्यरत होती आणि जी व्यक्ती, अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायीच्या मते किंवा संहितेच्या तिसऱ्या अनुसूचीत नमूद केलेल्या आजारांपैकी कोणत्याही आजाराने ग्रस्त आहे, असे वाटल्यास, अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायीक विलंब न लावता मुख्यनिरीक्षक-सह-सुविधाकारास लेखी स्वरूपात तसा अहवाल कळवील,

ज्यात पुढील बाबी नमूद असतील -

क) रुग्णाचे नाव आणि पत्रव्यवहाराचा पूर्ण पत्ता

ख) ज्या आजाराने तो रुग्ण ग्रस्त आहे असे त्यास वाटते तो आजार, आणि

ग) रुग्ण ज्या आस्थापनेत कार्यरत आहे, किंवा शेवटी कार्यरत होता, त्या आस्थापनेचे नाव व पत्ता:

प्रकरण-चार

व्यावसायिक सुरक्षा व आरोग्य सल्लागार मंडळ

८. कलम १७ खालील राज्य व्यावसायिक सुरक्षा व आरोग्य सल्लागार मंडळ.-

(१) मंडळाची रचना:- महाराष्ट्र व्यावसायिक सुरक्षा व आरोग्य सल्लागार मंडळामध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल, जसे की:-

(क)	महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागाचे अपर मुख्य सचिव किंवा प्रधान सचिव किंवा सचिव-	पदसिद्ध -अध्यक्ष;
(ख)	महाराष्ट्र शासनाचे कामगार आयुक्त-	पदसिद्ध -सदस्य;
(ग)	महाराष्ट्र शासनाचे मुख्य निरीक्षक-सह-सुविधाकार -	पदसिद्ध -सदस्य;
(घ)	सचिव- नि- मुख्यकार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणमंडळ-	पदसिद्ध सदस्य;
(ङ)	महासंचालक, कर्मचारी राज्य विमा महामंडळ याचा प्रतिनिधी-	पदसिद्ध -सदस्य;
(च)	संचालक, आरोग्यसेवा, महाराष्ट्र शासन	पदसिद्ध -सदस्य;
(छ)	नियोक्त्यांचे पाच प्रतिनिधी (बांधकाम व्यावसायिक किंवा विकासक यांचा एक प्रतिनिधी)-	सदस्य;

(ज)	कर्मचाऱ्यांचे पाच प्रतिनिधी (बांधकाम कामगारांचा एक प्रतिनिधी) -	सदस्य;
(झ)	ज्या बाबींकरिता मानके, नियम, धोरणे तयार करण्यात येत आहेत त्या बाबींशी सहयोगी असलेल्या व्यावसायिक संस्थेचा प्रतिनिधी-	सदस्य;
(ञ)	व्यावसायिक सुरक्षा व आरोग्य या क्षेत्राशी संबंधित असलेली विख्यात व्यक्ती, किंवा विख्यात संशोधन संस्थांमधील किंवा इतर तत्सम ज्ञान शाखेतील प्रतिनिधी-	सदस्य;
(ट)	महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागाचे सह सचिव किंवा उप सचिव-	पदसिद्ध सदस्य-सचिव.

(२) अशासकीय सदस्य पोट-नियम (१) च्या खंड (छ), (ज), (झ) व (ञ) यांमध्ये विनिर्दिष्ट केलेले राज्य मंडळाचे सदस्य, राज्य शासनाकडून नामनिर्देशित करण्यात येतील. अशासकीय सदस्यांचा पदावधी, तीन वर्षे इतका असेल.

(३) मंडळाच्या बैठका व गणपूर्ती:-

(क) अध्यक्षांनी निश्चित केलेल्या ठिकाणी आणि नमुद वेळी मंडळाची, किमान तीन महिन्यांमधून एकदा बैठक होईल किंवा आवश्यक असेल त्याप्रमाणे अनेक वेळा बैठक घेता येईल:

परंतु, अध्यक्ष, मंडळाच्या एक-तृतीयांशपेक्षा कमी नसतील अशा सदस्यांकडून लेखी मागणी प्राप्त झाल्यापासून कामकाजाच्या पंधरा दिवसांच्या आत, त्याची विशेष बैठक बोलावील.

(ख) नियोक्त्यांचे व कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधित्व करणारा प्रत्येकी किमान एक सदस्य उपस्थित असेल आणि किमान दोन-तृतीयांश सदस्य उपस्थित असल्याशिवाय, कोणत्याही बैठकीत कोणतेही कामकाज करण्यात येणार नाही:

परंतु, जर कोणत्याही बैठकीत, दोन-तृतीयांशपेक्षा कमी सदस्य उपस्थित असतील तर,अध्यक्ष, उपस्थित असलेल्या सदस्यांना माहिती देऊन आणि संस्थगित केलेल्या बैठकीत,मग अशा बैठकीत विहित केलेली गणपूर्ती असो किंवा नसो, कामकाज उरकण्याचे त्याने योजिलेले आहे अशी नोटीस अन्य सदस्यांना देऊन, दुसऱ्या तारखेपर्यंत बैठक संस्थगित करू शकेल, आणि त्यानंतर, उपस्थित असणाऱ्या सदस्यांची संख्या विचारात न घेता, संस्थगित केलेल्या बैठकीत कामकाज पार पाडणे त्याच्यासाठी कायदेशीर असेल:

परंतु आणखी असे की, जेव्हा अध्यक्ष, त्याच्या मते, जी तातडीच्या स्वरूपाची आहे अशा कोणत्याही बाबीवर विचार करण्यासाठी बैठक बोलावील तेव्हा, कामकाजाच्या सात दिवसांपेक्षा कमी नसेल इतक्या दिवसांची नोटीस पुरेशी असल्याचे मानण्यात येईल.

(४) राजीनामा.- पदसिद्ध सदस्य नसणाऱ्या मंडळाच्या सदस्यास, मंडळाच्या अध्यक्षाला उद्देशून लेखी पत्राद्वारे त्याच्या पदाचा राजीनामा देता येईल.

(५) सदस्यत्वाची समाप्ती.- जर पदसिद्ध सदस्य नसलेला मंडळाचा कोणताही सदस्य, अशा अनुपस्थितीसाठी मंडळाच्या अध्यक्षांनी मंजूर केलेली रजा घेतल्याशिवाय, मंडळाच्या सलग तीन बैठकांना गैरहजर राहिला तर त्याचे, मंडळाचे सदस्यत्व समाप्त होईल:

परंतु, राज्य शासन, जर लागोपाठच्या तीन बैठकांना गैरहजर राहण्यासाठी अशा सदस्याकडे पुरेसे कारण आहे अशी खात्री पटली तर, शासन, अशी सदस्यत्व समाप्ती होणार नाही असा निदेश देऊ शकेल आणि असा निदेश देण्यात आल्यावर, असा सदस्य, मंडळाचा सदस्य असल्याचे चालू राहील.

(६) सदस्यत्वाची अपात्रता.- एखादी व्यक्ती,-

(एक) जर ती मनोरुग्ण असेल आणि ती तशी असल्याचे सक्षम न्यायालयाने घोषित केले असेल तर;

(दोन) जर ती अविमुक्त नादार असेल तर; किंवा

(तीन) जर तिला, तीन महिने किंवा त्याहून अधिक मुदतीची कारावासाची शिक्षा असणाऱ्या अपराधाबद्दल दोषी सिद्ध ठरविण्यात आले असेल तर, ती मंडळाची सदस्य असण्यासाठी अपात्र ठरेल.

(७) सदस्यत्व काढून घेणे.- राज्य शासनाच्या मते, जर एखाद्या सदस्याने अशा मंडळावर प्रतिनिधित्व करण्याचे उद्देशित असलेल्या हिताचे प्रतिनिधित्व करण्याचे बंद केले असेल तर, राज्य शासन, मंडळाच्या अशा सदस्याला काढून टाकू शकेल:

परंतु, अशा कोणत्याही सदस्याला, बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय, त्याला काढून टाकण्यात येणार नाही.

(८) **सर्वसाधारण रिक्त पदे** -जेव्हा मंडळाच्या सदस्यत्वामध्ये जागा रिक्त होईल तेव्हा, मंडळाचा सदस्य-सचिव, राज्य शासनाला अहवाल सादर करील, आणि असा अहवाल प्राप्त झाल्यावर, राज्य शासनास, रिक्त जागा भरण्यासाठी एखाद्या व्यक्तीला, अधिसूचनेद्वारे नामनिर्देशित करता येईल आणि अशा प्रकारे नामनिर्देशित केलेली व्यक्ती, ज्या सदस्याच्या जागी तिला नामनिर्देशित केले असेल त्या सदस्याच्या उर्वरित पदावधीसाठी पद धारण करील.

(९) सदस्यांसाठी प्रवासभत्ता.- (एक) शासकीय सदस्याच्या प्रवास भत्त्याचे, शासकीय कर्तव्यांवर असताना त्याने केलेल्या प्रवासासाठी त्याला लागू असलेल्या नियमांनुसार विनियमन करण्यात येईल आणि त्याचे वेतन प्रदान करणाऱ्या प्राधिकरणाद्वारे तो प्रदान करण्यात येईल;

(दोन) मंडळाच्या अशासकीय सदस्यांना, मंडळाच्या बैठकीस उपस्थित राहिल्याबद्दल राज्य शासनाकडून वेळोवेळी निश्चित करण्यात येतील अशा दरांनी प्रवास भत्ता प्रदान करण्यात येईल.

९. कलम २२ अन्वये सुरक्षा समिती.- (१) ज्या आस्थापनेच्या कोणत्याही बांधकाम स्थळावर (साइटवर) मागील बारा महिन्यांमध्ये कोणत्याही एका दिवशी दोनशे पन्नास किंवा अधिक कामगार सर्वसाधारणपणे काम करीत असतील अशा प्रत्येक इमारत व इतर बांधकाम आस्थापनेमध्ये सुरक्षा समिती गठीत करण्यात येईल.

(२) सुरक्षा समितीचा कार्यकाळ, तीन वर्षांचा किंवा काम पूर्ण होईपर्यंत असेल. सुरक्षा समितीची, प्रत्येक तीन महिन्यांमध्ये किमान एकदा बैठक होईल.सुरक्षा समितीच्या बैठकीची इतिवृत्ते नोंदवण्यात येतील आणि मागणी केल्यावर निरीक्षक-सह-सुविधाकारास सादर करण्यात येतील.

(३) सुरक्षा समितीला,-

(क) कामाच्या ठिकाणी कर्मचारी जे निदर्शनास आणतील असे सुरक्षा व आरोग्यविषयक संभाव्य धोके;

(ख) अपघातांबाबतची आकडेवारी (डेटा) तसेच कामाच्या वातावरणाच्या व कामाच्या स्थळावर (साइटवर) काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या आरोग्याच्या संनिरीक्षणातून उघड झालेली आकडेवारी (डेटा) या बाबत परिपूर्णपणे व योग्य रीतीने जाणून घेण्याचा हक्क असेल.

(४) मालक, नियोक्ता, भोगवटादार, अभिकर्ता किंवा व्यवस्थापक, सुरक्षा समितीच्या शिफारशी मिळाल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या कालावधीत, शिफारशी अंमलात आणण्याची कारवाई करील.

(५) सुरक्षा समितीची रचना.- क) सुरक्षा समितीवर व्यवस्थापनाच्या प्रतिनिधींमधील खालील सदस्यांचा अंतर्भाव असेल:-

(एक) जो संघटनेतील त्याच्या पदाद्वारे सुरक्षा समितीच्या कामकाजात प्रभावीपणे योगदान देऊ शकेल असा एक वरिष्ठ अधिकारी, अध्यक्ष असेल;

(दोन) जेथे उपलब्ध असेल तेथे सुरक्षा अधिकारी व वैद्यकीय अधिकारी आणि अशा प्रकरणी सुरक्षा अधिकारी हा, समितीचा सचिव असेल; आणि

(तीन) त्या आस्थापनेच्या प्रत्येक विभागातील प्रत्येकी एक प्रतिनिधी,-

परंतु, सुरक्षा समितीवर महिला कामगारांचे पुरेसे प्रतिनिधित्व असेल आणि असे प्रतिनिधित्व आस्थापनेत कामावर असलेल्या एकूण कामगारांच्या संख्येतील महिला कामगारांच्या प्रमाणापेक्षा कमी असणार नाही :

(ख) (एक) सुरक्षा समितीमध्ये नियोक्ता आणि कामगार यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सदस्यांची संख्या समान असेल, जी वीसपेक्षा अधिक नसेल:

(दोन) सुरक्षा समितीमधील नियोक्त्याचे प्रतिनिधी नियोक्त्याद्वारे नामनिर्देशित केले जातील आणि ते शक्यतोवर, आस्थापनेच्या कामकाजाशी थेट संपर्कात असलेले किंवा संबंधित असलेले अधिकारी, प्राधान्याने आस्थापनेच्या मुख्य (महत्वाच्या) विभागांचे प्रमुख असतील.

(तीन) सुरक्षा समितीतील कामगारांचे प्रतिनिधी पुढील प्रमाणे दिलेल्या रीतीने निवडण्यात येतील :-

(क) जिथे औद्योगिक संबंध संहिता, २०२० (२०२० चा ३५) याच्या कलम १४ च्या पोट-कलम (२) किंवा पोट-कलम (३) अन्वये एकमेव वाटाघाटी करणारी संघटना किंवा वाटाघाटी करणारी संघटना किंवा कलम १४ च्या पोट-कलम (४) अन्वये वाटाघाटी परिषद किंवा वाटाघाटी करणारी संघटना किंवा उक्त पोट-कलम (३) अन्वये वाटाघाटी परिषद, यथास्थिती, सुरक्षा समितीवर कामगारांच्या प्रतिनिधींना नामनिर्देशित करील आणि वाटाघाटी परिषदेच्या बाबतीत, नामनिर्देशन अशा पद्धतीने केले जाईल की, वाटाघाटी परिषदेत प्रतिनिधित्व करणाऱ्या प्रत्येक नोंदणीकृत

कामगार संघटनेला, औद्योगिक आस्थापनेतील त्या कामगार संघटनेचे सदस्य असलेल्या कामगारांच्या संख्येच्या प्रमाणात सुरक्षा समितीत प्रतिनिधित्व मिळेल;

(ख) खंड (क) मध्ये संदर्भित केल्याप्रमाणे जेथे अशी कोणतीही एकमेव वाटाघाटी करणारी संघटना किंवा वाटाघाटी करणारी संघटना किंवा वाटाघाटी करणारी परिषद अस्तित्वात नसल्यास, तेथे औद्योगिक आस्थापनेतील कामगार, सुरक्षा समितीवरील आपले प्रतिनिधी आपापसांतून (स्वतः मधूनच) निवडतील:

परंतु, नियोक्ता, कामगारांच्या प्रतिनिधीची निवड करण्याची प्रक्रिया पार पाडण्यासाठी, माहिती तंत्रज्ञान वापर (ॲप्लिकेशन), ऑनलाइन प्लॅटफॉर्म किंवा तत्सम इतर प्लॅटफॉर्मद्वारे इलेक्ट्रॉनिक पद्धतीचा अवलंब करू शकेल:

परंतु आणखी असे की, सुरक्षा समितीच्या सदस्यांचा कार्यकाळ तीन वर्षांचा असेल.

परंतु, जर कोणतीही मान्यताप्राप्त वाटाघाटी संघटना किंवा वाटाघाटी परिषद अस्तित्वात नसेल आणि सुरक्षा समितीवर कामगार प्रतिनिधी निवडण्याबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास, हे प्रकरण संबंधित विभागीय कामगार आयुक्तांकडे संदर्भित केले जाऊ शकते, जे दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर या प्रकरणावर निर्णय देतील आणि त्यांचा निर्णय अंतिम असेल.

(६) सुरक्षा समितीच्या बैठकीची इतिवृत्ते, समितीच्या सचिवाकडून नोंदवण्यात येतील.

(७) सुरक्षा समितीची कार्ये व कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील:-

(एक)'सुरक्षा व आरोग्य धोरण' या मध्ये अधोरेखित केलेली ध्येये व उद्दिष्टे साध्य करण्यासाठी व्यवस्थापनाला मदत करणे व सहकार्य करणे;

(दोन) आरोग्य,सुरक्षा व पर्यावरण यांच्याशी संबंधित असणाऱ्या सर्व बाबी हाताळणे आणि उद्भवलेल्या समस्यांवर व्यवहार्य उपाय योजणे;

(तीन) सर्व कामगारांमध्ये सुरक्षा विषयक जागरूकता निर्माण करणे;

(चार) सुरक्षा व आरोग्याशी संबंधित असणारे शिक्षणात्मक प्रशिक्षण व प्रोत्साहनात्मक उपक्रम हाती घेणे;

(पाच) सुरक्षा, पर्यावरणीय वव्यावसायिक आरोग्य सर्वेक्षण, सुरक्षा विषयक परिनिरीक्षण, जोखीम मूल्य निर्धारण, आपत्कालीन व आपत्ती व्यवस्थापन आराखडे आणि अहवालांमध्ये केलेल्या शिफारशींच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण यावरील अहवालांवर चर्चा करणे;

(सहा) ज्यामुळे कामगारांची सुरक्षा व आरोग्य धोक्यात येण्याचा संभव आहे अशा बाबी विचारात घेणे आणि त्यावर सुधारात्मक उपाययोजना सुचवणे; आणि

(सात) समितीने केलेल्या शिफारशींच्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.

१०. इमारत किंवा इतर बांधकाम कामांसाठी सुरक्षा अधिकारी.- (१) जर एखादी व्यक्ती,-

(एक) मान्यताप्राप्त विद्यापीठातून अभियांत्रिकी किंवा तंत्रज्ञान यापैकी कोणत्याही शाखेतील पदवी आणि दोन वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीसाठी पर्यवेक्षकीय क्षमतेतील प्रत्यक्ष अनुभव; किंवा

(दोन) मान्यताप्राप्त विद्यापीठातून भौतिकशास्त्र किंवा रसायनशास्त्र यातील पदवी किंवा अभियांत्रिकी किंवा तंत्रज्ञान यापैकी कोणत्याही शाखेतील पदविका आणि पाच वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीसाठी पर्यवेक्षकीय क्षमतेतील प्रत्यक्ष अनुभव,

आणि

मान्यताप्राप्त विद्यापीठातून औद्योगिक सुरक्षेतील पदवी किंवा तंत्र शिक्षण मंडळाने किंवा अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने किंवा याबाबतीत राज्यशासनाने मान्यता दिलेल्या विद्यापीठाने मान्यता दिलेले औद्योगिक सुरक्षेतील एक वर्षाचे पूर्ण वेळ पदविका प्रमाणपत्र, धारण करीत नसेल

तर, ती व्यक्ती, इमारत किंवा इतर बांधकाम कार्य यांच्याशी संबंधित असणारा सुरक्षा अधिकारी म्हणून नियुक्तीसाठी पात्र असणार नाही.

(२) पोट-नियम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जी व्यक्ती,-

(एक) मान्यताप्राप्त विद्यापीठातून अभियांत्रिकीची किंवा तंत्रज्ञानाची पदवी आणि इमारत प्रशासन किंवा इतर बांधकामे यांच्याशी संबंधित असलेल्या केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या विभागातील पाच वर्षांपेक्षा कमी नसेल इतका अनुभव धारण करीत असेल; किंवा

(दोन) मान्यताप्राप्त विद्यापीठातून अभियांत्रिकी किंवा तंत्रज्ञान यापैकी कोणत्याही शाखेतील पदवी आणि बांधकामामधील अपघात प्रतिबंध क्षेत्रातील पूर्ण वेळ प्रशिक्षण, शिक्षण, समंत्रणा किंवा संशोधन या मधील पाच वर्षांपेक्षा कमी नसेल इतका अनुभव धारण करीत असेल,

अशी कोणतीही व्यक्ती, सुरक्षा अधिकारी म्हणून नियुक्तीसाठी देखील पात्र असेल.

(३) इमारत किंवा इतर बांधकामांसाठी सुरक्षा अधिकाऱ्याची नियुक्ती:-

अ. बांधकाम कामगार संख्या ५०० पर्यंत - एक सुरक्षा अधिकारी;

ब. बांधकाम कामगार संख्या १००० पर्यंत - दोन सुरक्षा अधिकारी;

क. बांधकाम कामगार संख्या २००० पर्यंत - तीन सुरक्षा अधिकारी;

ड. बांधकाम कामगार संख्या ५००० पर्यंत - चार सुरक्षा अधिकारी;

ई. प्रत्येक अतिरिक्त २००० कामगारांसाठी किंवा त्याच्या भागाकरिता - एक सुरक्षा अधिकारी.

११. इमारत किंवा इतर बांधकाम कार्याच्या बाबतीत सुरक्षा अधिकाऱ्याची कर्तव्ये.- व्यक्तिगत दुखापतीस प्रतिबंध करण्याच्या आणि कामाचे वातावरण सुरक्षित राखण्याच्या संबंधातील सुरक्षा समितीची वैधानिक दायित्वे पूर्ण करण्यासाठी सुरक्षा समितीला सल्ला देणे व सहाय्य करणे हे, सुरक्षा अधिकाऱ्याचे कर्तव्ये असेल, आणि या कर्तव्यांमध्ये पुढील कर्तव्यांचा समावेश असेल, जसे की:-

(एक) व्यक्तिगत दुखापतींना प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांचे नियोजन व व्यवस्थाकरण्यामध्ये संबंधित विभागांना सल्ला देणे;

(दोन) सर्व नोकरी विषयक अभ्यासांमधील सुरक्षाविषयक पैलूंबाबत सल्ला देणे आणि निवडक नोकऱ्यांच्या नोकरी विषयक सुरक्षेचा अभ्यास करणे;

(तीन) व्यक्तिगत दुखापतीस प्रतिबंध करण्याकरिता हाती घेतलेल्या किंवा हाती घेण्याचे प्रस्तावित केलेल्या कारवाईच्या परिणामकारकतेची तपासणी करणे व मूल्यमापन करणे;

(चार) बांधकामाच्या ठिकाणी (साइट) सुरक्षा निरीक्षण करण्याशी संबंधित असलेल्या बाबींवर सल्ला देणे;

(पाच) कामाच्या वास्तविक परिस्थितीचे आणि कामगारांनी अनुसरण केलेल्या कामाच्या पद्धती व कार्यपद्धती यांची पाहणी करण्याच्या दृष्टीने स्थळ (साइट) सुरक्षा निरीक्षण करणे आणि असुरक्षित भौतिक परिस्थिती दूर करण्याकरिता आणि कामगारांकडून केल्या जाणाऱ्या असुरक्षित कृत्यांना प्रतिबंध करण्याकरिता अंगीकार करावयाच्या उपाययोजनां औबाबत सल्ला देणे;

(सहा) अपघातांचा व रोगांचा अहवाल देण्याशी व अन्वेषण करण्याशी संबंधित असलेल्या बाबींवर सल्ला देणे;

(सात) निवडक अपघातांची तपासणी करणे;

(आठ) संहितेच्या तिसऱ्या अनुसूचीमध्ये सूचीबद्ध केलेल्या दखलपात्र रोगांच्या बाबतीत तपासणी करणे;

(नऊ) ज्यायोगे आस्थापनेतील कामगारांमध्ये उत्साह निर्माण होईल व फोटो राखला जाईल आणि कामाच्या ठिकाणी सुरक्षित स्थिती व कार्यपद्धती राखली जाईल यासाठी संबंधित विभागाच्या सहभागाने मोहिमा, स्पर्धा, लढती किंवा अन्य उपक्रम आयोजित करणे; आणि व्यक्तिगत इजा

होण्यास प्रतिबंध होण्याकरिता, एकतर स्वतंत्रपणे किंवा प्रशिक्षण विभागाच्या सहभागाने सुयोग्य प्रशिक्षण व शैक्षणिक कार्यक्रम तयार करणे व चालविणे.

प्रकरण-पाच

कामाचे तास व वार्षिक रजा वेतन

१२. कलम २५ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ख) खालील दैनिक व साप्ताहिक कामाचे तास.- साप्ताहीक कामाचे तास, कामाचा कालावधी व विश्रांतीसाठी मध्यांतर हे, राज्य शासनाकडून वेळोवेळी अधिसूचित केल्याप्रमाणे असतील.

१३. कलम २६ च्या पोट-कलम (२) खालील साप्ताहिक विश्रांतीचा दिवस.- कलम २६ च्या प्रयोजनार्थ, प्रत्येक आस्थापनेच्या कार्यालयाच्या एखाद्या दर्शनी जागी, साप्ताहिक विश्रांतीचा दिवस दर्शविणारी नोटीस लावण्यात येईल. जेव्हा आस्थापनेमध्ये नोकरी करीत असलेल्या सर्व व्यक्तींसाठी साप्ताहिक विश्रांतीचा दिवस एकच नसेल तेव्हा, व्यक्तींच्या प्रत्येक पाळीसाठी (रिलेसाठी) किंवा समूहासाठी किंवा एखाद्या व्यक्तीसाठी मुभा दिलेला विश्रांतीचा दिवस, नोटीसीवर दर्शविण्यात येईल.

१४. कलम २६ खालील बदली सुट्ट्या.- (१) जे काम तांत्रिक कारणां साठी संपूर्ण दिवसभर सतत केले पाहिजे अशा कोणत्याही कामामध्ये काम करीत असलेल्या कामगारांच्या बाबतीत, कलम २६ अन्वये बदली सुट्ट्यांचे अशा प्रकारे नियोजन करण्यात येईल की, एका आठवड्यामध्ये दोनपेक्षा अधिक सुट्ट्या दिल्या जाणार नाहीत.

(२) आस्थापनेचा व्यवस्थापक, कामगारांनी ज्या महिन्यामध्ये सुट्ट्या गमावलेल्या आहेत त्या महिन्याच्या अखेरीस किंवा त्यापूर्वी, पुढील महिन्यांमध्ये बदली सुट्ट्या घेण्याची परवानगी दिलेल्या कामगारांच्या व त्याच्या तारखांच्या बाबतीतील नोटीस, ज्या ठिकाणी कलम २६ अन्वये विहित केलेल्या कामाच्या कालावधीची नोटीस प्रदर्शित केली जाते त्या ठिकाणी प्रदर्शित करण्यात येईल.

कोणत्याही बदली सुट्टीच्या बाबतीतील नोटीसीमधील नंतरचा कोणताही बदल, त्या सुट्टीच्या तारखेच्या किमान तीन दिवस आधी करण्यात येईल.

(३) कामगार हक्कदार असलेली कोणतीही बदली सुट्टी किंवा सुट्ट्या, त्याला कार्यमुक्त केले जाण्यापूर्वी किंवा बडतर्फ केले जाण्यापूर्वी देण्यात येतील आणि कार्यमुक्त किंवा बडतर्फ करण्यापूर्वी देण्याची आवश्यकता असलेल्या नोटीसीच्या कोणत्याही कालावधीचा भाग म्हणून त्यांची गणना करण्यात येणार नाही.

१५. कलम २७ खालील अतिकालिक कामासाठी अतिरिक्त वेतन.-संहितेच्या कलम २७च्या अनुसार,जेव्हा एखादा कामगार, एखाद्या आस्थापनेत एका दिवसात आठ तासांपेक्षा अधिक काळ, किंवा यथास्थिति, एका आठवड्यात अठ्ठेचाळीस तासांपेक्षा अधिक काळ काम करतो तेव्हा, तो अशा अति कालिक कामाच्या बाबतीत, त्याच्या वेतनाच्या सर्व साधारण दराच्या दुप्पट दराने वेतन मिळण्यास हक्कदार असेल आणि सदर चे वेतन, प्रत्येक वेतन कालावधीच्या शेवटी प्रदान करण्यात येईल:

परंतु, एखाद्या तिमाहीतील अतिकालीक कामाचे तास हे, १४४ तासांपेक्षा अधिक असणार नाहीत.

प्रकरण-सहा

नोंदवह्या, अभिलेख व विवरणे ठेवणे

१६. कलम ३१ च्या पोट-कलम (२) खालील कामाच्या कालावधीची नोटीस.- संहितेच्या कलम ३१ च्या पोट-कलम(२) मध्ये विनिर्दिष्ट केलेली नोटीस, आस्थापनेतील दर्शनी जागी सूचना फलकावर किंवा इलेक्ट्रॉनिक बोर्डवर प्रदर्शित करण्यात येईल आणि **नमुना-नऊ** मध्ये ठेवण्यात येईल आणि नोटीसीची प्रत, निरीक्षक-सह-सुविधाकारास इलेक्ट्रॉनिक स्वरूपात किंवा नोंदणीकृत डाकेने पाठवण्यात येईल.

१७. कलम ३३ अन्वये अहवाल, नोंदवह्या व इतर अभिलेख ठेवणे व सादर करणे.- (१) आस्थापनेचा प्रत्येक नियोक्ता,

(क) **नमुना १०** मधील कर्मचाऱ्यांची नोंदवही जतन करील.

(ख) **नमुना १० अ** मधील हजेरीपुस्तक-नि-हजेरीपट वही याची नोंदवही जतन करील.

(ग) **नमुना १० ब** मधील वेतन, अतिकालिक काम व वजावट यांची नोंदवही जतन करील.

(घ) या प्रकरणाखालील नोंदवह्या इलेक्ट्रॉनिक किंवा इतर स्वरुपात जतन करण्यात येतील.

(ङ) प्रत्येक नियोक्ता, मागणी केल्यानंतर, निरीक्षक-सह-सुविधाकार किंवा राज्य शासनाने त्याबाबतीत प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीसमोर, अभिलेख आणि नोंदवह्या सादर करील.

(२) प्रत्येक नियोक्ता, कर्मचाऱ्याला वेतन देण्याच्या एक दिवस आधी, महाराष्ट्र वेतन संहिता नियम, २०२६ आणि वेतन संहिता, २०१९ याच्या कलम ५० च्या पोट-कलम (३) अन्वये विहित केलेल्या **नमुना १० क** मध्ये वेतन चिठ्ठ्या, इलेक्ट्रॉनिक पद्धतीने किंवा कागदोपत्री जारी करील.

(३) ज्या आस्थापनांना वेतन संहिता २०१९, सामाजिक सुरक्षा संहिता २०२० अन्वये तयार केलेल्या नियमांनुसार नोंदवही ठेवणे आवश्यक आहे, त्या आस्थापनांच्या बाबतीत, त्या संहिता आणि त्याअंतर्गत बनवलेल्या नियमांनुसार आस्थापनेच्या नियोक्त्याने ठेवणे आवश्यक असलेल्या खालील नोंदवह्या आणि वेतन चिठ्ठ्या, या नियमांनुसार नियोक्त्याकडून ठेवण्यात येत आहेत असे मानले जाईल :-

(अ) कर्मचाऱ्यांची नोंदवही

(ब) हजेरीपुस्तक-नि-हजेरीपट वही

(क) वेतन, अतिकालिक काम आणि वजावटींची नोंदवही

(ड) वेतन चिठ्ठी.

(४) हस्तलिखित नोंदवह्या आणि इतर अभिलेखांच्या बाबतीत, ते इंग्रजी, हिंदी आणि मराठीमध्ये किंवा कामावर असलेल्या बहुसंख्य व्यक्तींना समजणाऱ्या भाषेत शाईने सुवाच्य अक्षरात लिहिलेले असावेत आणि,निरीक्षक-सह-सुविधाकार किंवा राज्य शासनाने त्याबाबतीत प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीकडून, मागणी केली जाईल तेव्हा, सादर करण्यात येतील ;

(५) संहिता आणि त्याअंतर्गत बनवलेल्या नियमांनुसार ठेवणे आवश्यक असलेल्या सर्व नोंदवह्या, आणि इतर अभिलेख परिपूर्ण आणि अद्ययावत ठेवण्यात येतील आणि अन्यथा तरतूद केलेली नसल्यास, ती कार्यस्थळाच्या परिसरातील कार्यालयात किंवा सर्वात जवळच्या सोयीस्कर इमारतीत किंवा तीन किलोमीटर क्षेत्राच्या आतील ठिकाणी ठेवली जातील. सर्व नोंदवह्या आणि इतर अभिलेख, त्यामध्ये केलेल्या शेवटच्या नोंदीच्या तारखेपासून पाच कॅलेंडर वर्षांच्या कालावधीसाठी मूळ स्वरूपात जतन करण्यात येतील.

१८. सूचनाफलक प्रदर्शित करणे.- प्रत्येक नियोक्ता, आस्थापनाचे नाव व पत्ता, कामाचे तास, वेतन कालावधी,असे वेतन प्रदान करण्याची तारीख, मागील पाच वर्षांत आस्थापनेमध्ये घडलेल्या अपघाताचा व धोकादायक घटनेचा तपशील, अशा आस्थापनेचे अधिकार क्षेत्र असणाऱ्या निरीक्षक-सह-सुविधाकाराचे नाव व पत्ता आणि कामगारांचे थकीत वेतन प्रदान करण्याची तारीख दर्शविणारी नोटीस, त्याच्या नियंत्रणाखालील आस्थापनेच्या कामाच्या ठिकाणाच्या दर्शनी भागावर इंग्रजीमध्ये, मराठीमध्ये व बहुसंख्य कामगारांना समजणाऱ्या स्थानिक भाषेत प्रदर्शित करील.

१९. विवरणपत्र.- प्रत्येक आस्थापनेचा नियोक्ता, कर्मचाऱ्यांची श्रेणी, आरोग्य व कल्याण सुविधा, कामगार कपात/कामबंदी, बोनस, प्रसूती लाभ इत्यादी यांच्याशी संबंधित **नमुना-११** मधील अशा आस्थापनेशी संबंधित विवरणपत्र दरवर्षी अधिकारिता असणाऱ्या निरीक्षक-सह-सुविधाकारास त्याला प्रत्येक कॅलेंडर वर्षाच्या समाप्तीनंतर येणाऱ्या १ फेब्रुवारीपर्यंत पोहोचेल अशा रीतीने पाठवील तसेच याची एक प्रत महासंचालक, कामगार ब्युरो यांना इलेक्ट्रॉनिक स्वरुपात पाठवील.

Part I-L Ext. No. 49.indd — 4a

२०. अपघाताची व धोकादायक घटनांची नोंद वही.- संहितेच्या कलम ३३ च्या खंड (क) च्या उप-खंड (पाच) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, अपघाताची व धोकादायक घटनांची नोंदवही, **नमुना-बारा** मध्ये ठेवण्यात येईल.

२१. कलम ३३ च्या खंड (क) खालील भरपगारी रजेची नोंद वही.- (१) प्रत्येक आस्थापनेचा नियोक्ता, त्याच्या प्रत्येक कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, भरपगारी रजेचा अभिलेख, **नमुना-तेरा** मध्ये इलेक्ट्रॉनिक किंवा हस्तलिखित स्वरूपात जतन करील.

(२)पोट-नियम(१)मध्ये नमूद केलेली नोंद वही, त्तिच्यातील शेवटची नोंद करण्यात आल्यानंतर तीन वर्षांच्या कालावधीसाठी जतन करून ठेवण्यात येईल आणि ती नोंदवही, नवीन नोंदवही मध्ये योग्यरित्या हस्तांतरित केल्याशिवाय, तो कालावधी संपल्यानंतर देखील ती नष्ट करता येणार नाही.

प्रकरण-सात

निरीक्षक-सह-सुविधाकार

२२. कलम ३५ च्या पोट-कलम (१) च्या खंड (चौदा) खालील निरीक्षक-सह-सुविधाकाराचे **अधिकार व कर्तव्ये.-** (१) निरीक्षक-सह-सुविधाकार, प्रत्येक निरीक्षणानंतर, आवश्यक वाटेल त्या प्रमाणे, नियोक्त्यास किंवा भोगवटादारास किंवा मालकास किंवा निदेशकास किंवा प्रभारी अधिकारी किंवा त्यांच्या प्रतिनिधीस संहितेअंतर्गत सुरक्षा, आरोग्य व कामाच्या स्थितीच्या तरतुदींचे आणि त्याखाली तयार केलेल्या नियमांचे व विनियमांचे पालन न केल्याबद्दल अधिसूचनेद्वारे विहित केल्यानुसार मनाई किंवा सुधारणा नोटीस देईल.

(२) निरीक्षक-सह-सुविधाकार, प्रत्येक निरीक्षणाच्या वेळी, मागील निरीक्षण शेऱ्यामध्ये नमूद केलेल्या कोणत्याही त्रुटींची किती प्रमाणात पूर्तता केलेली आहे आणि यापूर्वी काढलेल्या नोटिशींचे पालन करण्यात आलेले आहे किंवा कसे याची खात्री करील. त्याचे निष्कर्ष व निरीक्षण करताना निदर्शनास येतील अशा कोणत्याही त्रुटी त्याचबरोबर संहितेन्वये किंवा त्याखाली केलेल्या विनियमांन्वये त्याने दिलेला कोणताही आदेश नोंदविण्यात येईल व जतन करून ठेवण्यात येईल.

२३. कलम ४२ च्या पोट-कलम (१) अन्वये वैद्यकीय अधिकाऱ्याची नियुक्ती.- राज्य शासनाला, मोटार परिवहन उद्योग, औषधनिर्मिती उद्योग, बिडी व सिगारेट उद्योग, चित्रपट उद्योग, वृत्तपत्र उद्योग, बांधकाम उद्योग आणि राज्य शासनाकडून अधिसूचनेद्वारे विहित करण्यात येतील अशा अन्य कोणत्याही आस्थापना यांच्या संबंधात, संहितेच्या कलम ४२ च्या पोट-कलम (१) च्या प्रयोजनार्थ, संहितेमधील व्याख्येमध्ये नमूद केलेली अर्हता धारण करणाऱ्या पात्र वैद्यकीय व्यावसायिकाची वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्ती करता येईल.

२४. कलम ४३ अन्वये आस्थापनेतील किंवा कामाच्या स्थळावरील (साईटवरील) महिलांचा रोजगार.- प्रत्येक नियोक्ता,-

(क) महिला कर्मचाऱ्यांच्या संदर्भात, तिच्या संमतीने कोणत्याही दिवशी सकाळी ६.०० वाजण्यापूर्वी व संध्याकाळी ७.०० वाजेनंतरच्या कालावधीत, महिला कामगारांना किंवा कर्मचाऱ्यांना, त्यांच्या निवासस्थानापासून आणण्यासाठी व पुन्हा त्यांच्या निवासस्थानी सोडण्यासाठी पुरेशी वाहतूक सुविधा पुरविण्यात येईल याची निश्चिती करील;

(ख) प्रसाधनगृहे, स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी, महिला कामगारांची किंवा कर्मचाऱ्यांची प्रवेश करण्याची व बाहेर पडण्याची जागा यासंबंधीच्या सोयी व सुविधांकडे जाणाऱ्या मार्गिकांसह कामाच्या ठिकाणी पुरेशी प्रकाश योजना करील आणि या सुविधांकडे जाण्याच्या मार्गावर सीसीटीव्हीच्या तरतुदी पुरवील.

(ग) अशा महिला कामगार किंवा कर्मचारी काम करीत असलेल्या कामाच्या ठिकाणा जवळ प्रसाधनगृहे, स्वच्छतागृहे व पिण्याच्या पाण्याच्या सुविधा पुरवील;

(घ) कामाच्या ठिकाणी सुरक्षित, संरक्षित व आरोग्यदायी कामाची स्थिती ठेवील; आणि

(ङ) आस्थापनांना लागू असल्याप्रमाणे, कामाच्या ठिकाणी महिलांची लैंगिक छळवणूक करण्यास (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम, २०१३ (२०१३ चा १४) याच्या तरतुदींचे अनुपालन करील; आणि

(च) आस्थापनेचे कायमस्वरूपी दूरध्वनी क्रमांक, आस्थापना तसेच वाहनांच्या आतील ठळक जागेवर प्रदर्शित करण्यात यावेत जेणेकरून कोणत्याही महिला कर्मचाऱ्याला कोणत्याही तातडीच्या प्रसंगी किंवा आणीबाणीच्या परिस्थितीत त्याचा वापर करता येईल.

प्रकरण-आठ

कंत्राटी कामगार

२५. कलम ४७ च्या पोट-कलम (३) खालील अनुज्ञप्तीच्या शर्ती.- कंत्राटदार अशी खात्री करील की,-

(क) कामाचे तास, संहितेच्या कलम २५ अन्वये तयार केलेल्या नियमांच्या अनुरूप असतील;

(ख) वेतन संहिता, २०१९ (२०२० चा २९) आणि त्याखाली केलेल्या नियमांनुसार वेतन प्रदान करण्यात येईल;

(ग) जर कंत्राटी कामगार, मुख्य नियोक्त्याच्या आस्थापनेत काम करीत असतील तर, शौचालय, स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, आवश्यक असल्यास, आंघोळीच्या सुविधा, विश्रांती कक्ष, कपडे बदलण्याची खोली, प्रथमोपचार पेटी, आहारगृह (कँन्टीन) व पाळणाघर यांसारख्या सुविधा व साधने पुरविणे ही मुख्य नियोक्त्याची जबाबदारी असेल;

(घ) इतर सर्व सुविधा व आवश्यक साधने, कंत्राटदाराकडून पुरविण्यात येतील;

(ङ) जर कंत्राटदार, वेतन प्रदान करण्यास, किमान वेतन प्रदान करण्यास व कोणत्याही वैधानिक कायदेशीर देय रकमा प्रदान करण्यास असमर्थ ठरला असेल तर, सहायक कामगार आयुक्त दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी, नियम ३५ अन्वये ठेवलेल्या कंत्राटदाराच्या सुरक्षा अनामत रकमेमूधन कंत्राटी कामगारांना अशा रकमा प्रदान करण्याची व्यवस्था करील:

परंतु, जर सुरक्षा अनामत रक्कम पुरेशी नसेल तर, सहायक कामगार आयुक्त, त्या आस्थापनेच्या मुख्य नियोक्त्याद्वारे कंत्राटी कामगारांना अशा रकमा प्रदान करण्याची व्यवस्था करील, योग्य सुनावणी घेतल्यानंतर, यथोचित आदेश काढून रकमेतील फरक प्रदान करण्याकरिता मुख्य नियोक्ता जबाबदार असेल. जर आदेशाचे पालन न केल्यास, रकमेतील फरक, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करता येईल;

(च) कंत्राटदार, कंत्राटी कामाच्या आदेशाच्या तपशिलाबद्दल कंत्राटी कामाचा आदेश मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत आणि नियम ३४ अन्वये असलेल्या रीतीने प्राधिकाऱ्यास कळवील.

२६. कलम ४८ च्या पोट-कलम (१) अन्वये कंत्राटदार अनुज्ञप्तीकरिता अर्ज करण्याचा नमुना व रीत.- (१) अनुज्ञप्ती देण्यासाठी कंत्राटदाराद्वारे प्रत्येक अर्ज, नमुना- चौदा मध्ये राज्य पोर्टलद्वारे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने अनुज्ञप्ती प्राधिकाऱ्याकडे ऑनलाइन स्वरुपात करण्यात येईल.

(२) प्रत्येक अर्जासोबत, नियम ३१ च्या पोट-नियम (२) मध्ये नमूद केलेल्या बाबी आणि आस्थापनेच्या मुख्य उत्पादन कार्यात कंत्राटी कामगार काम करीत नसल्याबाबत नमुना-पंधरा मधील हमीपत्र कंत्राटदाराकडून जोडण्यात येईल.

(३) अनुज्ञप्ती देण्याच्या प्रत्येक अर्जासोबत, नमुना-सोळा मधील मुख्य नियोक्त्याचे प्रमाणपत्र जोडण्यात येईल.

(४) प्रत्येक अर्जासोबत, नियम २८ च्या पोट-नियम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने सुरक्षा अनामत रक्कम जमा करण्यात येईल आणि नियम २८ च्या पोट-नियम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने शुल्क प्रदान करण्यात येईल.

(५) अनुज्ञप्तीच्या प्रत्येक ऑनलाइन अर्जासोबत,-

(क) परिशिष्ट- ब मधील स्वयं-घोषणापत्र;

(ख) परिशिष्ट-क मधील स्वयं-साक्षांकनाचे स्वयं-घोषणापत्र, जोडण्यात येईल.

२७. अनुज्ञप्तीचे नमुने, अटी व शर्ती.-

(१) दिलेली प्रत्येक अनुज्ञप्ती, नमुना-सतरा मध्ये असेल.

(२) दिलेली किंवा नूतनीकरण केलेली प्रत्येक अनुज्ञप्ती, पुढील शर्तींच्या अधीन असेल, जसे की:-

(एक) अनुज्ञप्ती अहस्तांतरणीय असेल;

(दोन) कंत्राटदाराने कंत्राटी कामगार म्हणून कामावर ठेवलेल्या कामगारांची संख्या, कोणत्याही दिवशी, अनुज्ञप्तीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कमाल संख्येपेक्षा अधिक असणार नाही;

(तीन) अनुज्ञप्ती देण्यासाठी किंवा अनुज्ञप्तीच्या नूतनीकरणासाठी प्रदान केलेले शुल्क, परत करण्यायोग्य असणार नाही.

(चार) कंत्राटदाराने कामगारांना प्रदेय असलेले वेतनाचे दर, वेतन संहिता, २०१९ अन्वये विहित केलेल्या दरांपेक्षा कमी असणार नाहीत आणि जेव्हा करार, समझोता किंवा निवाडा याद्वारे दर निश्चित केलेले असतील तेव्हा, ते, वेतन संहिता २०१९ अन्वये विहित केलेल्या दरांपेक्षा कमी असणार नाहीत.

२८. कलम ४८ च्या पोट-कलम (२) अन्वये अनुज्ञप्ती देण्याची कार्यपद्धती.-

(१) या नियमांच्या कोणत्याही नियमान्वये अनुज्ञप्ती देण्यापूर्वी, अनुज्ञप्तीच्या शर्तींचे योग्य अनुपालन करण्यासाठी आणि संहितेच्या तरतुदींचे किंवा त्याखाली केलेल्या नियमांचे पालन करण्यासाठी ज्या

कामगारांच्या बाबतीत अनुज्ञप्तीसाठी अर्ज करण्यात आला आहे त्या कंत्राटी कामगार म्हणून काम करणाऱ्या प्रत्येक कामगारासाठी रुपये एक हजार या दराने परिगणना केलेल्या रकमेइतकी सुरक्षा अनामत रक्कम, कंत्राटदाराकडून सुरक्षा अनामत रक्कम म्हणून जमा करण्यात येईल.

(२) अनुज्ञप्ती देण्यासाठी प्रदान करावयाचे शुल्क, खालील तक्त्यामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असेल, जसे की:-

तक्ता

अ. क्र (१)	कोणत्याही एके दिवशी आस्थापनेमध्ये प्रस्तावित नियुक्त कंत्राटी कामगारांची संख्या (२)	शुल्क (रुपयांत) (३)
(क)	४९ कंत्राटी कामगारांपर्यंत अनुज्ञप्ती आवश्यक नाही.	निरंक
(ख)	५० व त्यापेक्षा अधिक परंतु १०० पेक्षा अधिक नसलेले कंत्राटी कामगार.	रु. १,०००
(ग)	१०१ व त्यापेक्षा अधिक परंतु ३०० पेक्षा अधिक नसलेले कंत्राटी कामगार.	रु.२,०००
(घ)	३०१ व त्यापेक्षा अधिक परंतु ५०० पेक्षा अधिक नसलेले कंत्राटी	रु.३,०००

	कामगार.	
(ङ)	५०१ व त्यापेक्षा अधिक परंतु १,००० पेक्षा अधिक नसलेले कंत्राटी कामगार.	रु.५,०००
(च)	१,००१ व त्यापेक्षा अधिक परंतु ५,००० पेक्षा अधिक नसलेले कंत्राटी कामगार.	रु.१०,०००
(छ)	५,००१ व त्यापेक्षा अधिक परंतु १०,००० पेक्षा अधिक नसलेले कंत्राटी कामगार.	रु.२०,०००
(ज)	१०,००१ व त्यापेक्षा अधिक परंतु २०,००० पेक्षा अधिक नसलेले कंत्राटी कामगार.	रु.३०,०००
(झ)	२०,००१ व त्या पेक्षा अधिक कंत्राटी कामगार.	रु.४०,०००

२९. कलम ४८ च्या पोट-कलम (२) खालील अनुज्ञप्तीचे नूतनीकरण.-

(१) प्रत्येक कंत्राटदार, अनुज्ञप्तीचे नूतनीकरण करण्यासाठी अनुज्ञप्ती प्राधिकाऱ्याकडे राज्य पोर्टलवर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने अर्ज करील.

(२) असा प्रत्येक अर्ज, पोट-नियम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या पोर्टलवर अनुज्ञप्तीचा कालावधी संपण्याच्या किमान ३० दिवस आधी सादर करण्यात येईल परंतु अशी अनुज्ञप्ती संपण्यापूर्वी ९० दिवसाच्या आधी सादर केला जाणार नाही.

(३) सुरक्षा अनामत रक्कम व अनुज्ञप्तीच्या नूतनीकरणासाठी आकारण्यायोग्य असलेले शुल्क, नियम २८ अन्वये अनुज्ञप्ती देण्यासाठी प्रदान करावयाच्या शुल्का इतकेच असेल:

परंतु, जर नूतनीकरणाचा अर्ज, पोट-नियम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वेळेत प्राप्त झाला नाही तर, एक महिन्याच्या विलंबासाठी शुल्काच्या पंचवीस टक्के अतिरिक्त शुल्क आणि त्यानंतर अनुज्ञप्ती देण्यासाठी दरमहा दहा टक्के अतिरिक्त शुल्क, अशा नूतनीकरणासाठी प्रदेय असेल.

३०. कलम ४८ (२) खालील सुरक्षा अनामत रकमेचा परतावा.-

(१) अनुज्ञप्तीचा कालावधी संपल्यावर, कंत्राटदार, जर त्याचा यापुढे अनुज्ञप्तीचे नूतनीकरण करण्याचा इरादा नसेल तर, त्याने जमा केलेल्या सुरक्षा अनामत रकमेचा परतावा मिळण्यासाठी, अनुज्ञप्तीची प्रत व काम पूर्ण झाल्याची सूचना आणि ज्यात रक्कम परत करणे आवश्यक आहे तो बँक तपशील तसेच त्या कंत्राटदाराने कामावर ठेवलेल्या कंत्राटी कामगारांची कोणतीही देय रक्कम प्रलंबित नसल्याबद्दल मुख्य नियोक्त्याकडील प्रमाणपत्र यासह अनुज्ञप्ती प्राधिकाऱ्याकडे अर्ज करील.

(२) जर अनुज्ञप्तीच्या शर्तींचे कोणतेही उल्लंघन झाले नाही किंवा सुरक्षा अनामत रक्कम किंवा त्याचा कोणताही भाग जप्त करण्याचा कोणताही आदेश झालेला नाही याबद्दल अनुज्ञप्ती

प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल तर, तो, अर्जदाराला सुरक्षा अनामत रक्कम परत करण्याचे निदेश देईल.

(३) जर कंत्राटदाराच्या सुरक्षा अनामत रकमेतून कोणताही रकमेचा भाग जप्त करण्याचा निर्देश देणारा कोणताही आदेश असेल तर, जप्त केलेली रक्कम, सुरक्षा अनामत रकमेतून वजा करील आणि शिल्लक रक्कम, कोणतीही असल्यास, ती कंत्राटदाराला परत करण्यात येईल.

(४) नोंदणी अधिकाऱ्याची खात्री पटल्यानंतर, शक्य असेल तोवर, अर्ज केल्यापासून कामाच्या तीस दिवसांच्या आत, परताव्याचा अर्ज निकालात काढण्यात येईल.

३१. कलम ४८ च्या पोट-कलम (४) खालील कंत्राटदाराची जबाबदारी.-

(१) कंत्राटदाराने, कामगारांना प्रदेय असलेल्या वेतनाचा दर, वेतन संहिता, २०१९ (२०१९ चा २९) अन्वये नियत केलेल्या दरांपेक्षा कमी असणार नाही आणि जेव्हा करार, समझोता किंवा निवाड्याद्वारे दर निश्चित करण्यात आलेले असतील तेव्हा, ते, वेतन संहिता, २०१९ अन्वये विहित केलेल्या दरांपेक्षा कमी असणार नाहीत.

(२) जेव्हा कंत्राटदाराने नियुक्त केलेले कामगार हे आस्थापनेच्या मुख्य नियोक्त्याने थेट कामावर नियुक्त केलेल्या कामगारांप्रमाणेच किंवा तत्सम प्रकारचे काम करीत असतील तर अशा बाबतीत,कंत्राटदाराच्या कामगारांचे वेतन दर, सुट्ट्या, कामाचे तास व त्यांच्या सेवेच्या इतर शर्ती, आस्थापनेच्या मुख्य नियोक्त्याने थेट कामावर नियुक्त केलेल्या कामगारांना लागू असल्याप्रमाणेच असतील. काम तत्सम प्रकारचे आहे किंवा कसे याबाबत कोणताही वाद उद्भवल्यास, असे प्रकरण,

विभागीय अपर कामगार आयुक्तांकडे किंवा विभागीय अधिकारक्षेत्राशी संबंधित विभागीय कामगार उपायुक्ताकडे सादर करण्यात येईल, त्यावरील त्याचा निर्णय अंतिम असेल.

(३) इतर बाबतीत,कंत्राटदाराच्या कामगारांचे वेतन दर, सुट्ट्या, कामाचे तास व त्यांच्या सेवेच्या इतर शर्ती, ही संहिता व त्याखाली केलेले नियमानुसार विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असतील.

(४) सर्व कंत्राटी कामगारांना, सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० (२०२० चा ३६) याच्या संबंधित तरतुदींन्वये लागू असलेल्या तरतुदींस अधीन राहून, कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी संघटनेचे (EPFO) आणि कर्मचारी राज्य विमा महामंडळाचे (ESIC) सदस्य करण्यात येईल.

(५) कंत्राटदार, कामगारांच्या संख्येतील किंवा कामाच्या शर्तींमधील कोणताही बदल, त्यातील बदल केल्याच्या तारखेपासून सात दिवसांच्या आत, कळवील.

३२. कलम ५० अन्वये कार्य आदेशाची सूचना व ती कळवण्याची कालमर्यादा.-

(१) प्रत्येक कंत्राटदार, कंत्राटी कामाचा आदेश मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत, मुख्य नियोक्त्याचे नाव, जेथे काम हाती घेण्यात येत आहे त्या जागेचा पत्ता, कंत्राटी काम सुरू केल्याची तारीख, त्या कार्य आदेशाअंतर्गत कामावर ठेवलेल्या कंत्राटी कामगारांची संख्या, कामाच्या आदेशाचा कालावधी आणि कामाच्या आदेशाची प्रत यासारखा तपशील अंतर्भूत असलेल्या कंत्राटी कामाच्या आदेशाबद्दल सूचना देईल:

परंतु, जेव्हा कंत्राटदाराने पोट-नियम (१) अन्वये सूचना देण्यास कसूर केली असेल त्या बाबतीत, पदनिर्देशित प्राधिकारी, अनुज्ञप्ती धारकास कारणे दाखवण्याची संधी दिल्यानंतर, अनुज्ञप्ती रद्द करण्याची किंवा निलंबित करण्याची कारणे नमूद करणारा सकारण आदेश पारित करून, अनुज्ञप्ती निलंबित करू शकेल किंवा रद्द करू शकेल.

(२) सूचना, राज्य पोर्टलवर किंवा ई-मेलवर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने अनुज्ञप्ती अधिकाऱ्याला पाठविण्यात येईल.

३३. कलम ५२ च्या पोट-कलम (१) खालील अपील.- संहितेच्या कलम ५२ च्या पोट-कलम (१) खालील अपिलीय प्राधिकारी हा, संबंधित विभागीय अधिकारक्षेत्र असलेला विभागीय अपर कामगार आयुक्त किंवा उपकामगार उपायुक्त असेल.

३४. कलम ५५ अन्वये वेतन प्रदानाची जबाबदारी.- (१) कंत्राटदार, ज्या कालावधीच्या बाबतीत वेतन प्रदेय असेल तो वेतन कालावधी निश्चित करील आणि वेतन कालावधी एक महिन्यापेक्षा अधिक असणार नाही.

(२) एखाद्या आस्थापनेमध्ये किंवा कंत्राटदाराने कंत्राटी कामगार म्हणून कामावर ठेवलेल्या प्रत्येक व्यक्तीचे वेतन, ज्या कालावधीच्या बाबतीत वेतन प्रदेय असेल त्या वेतन कालावधीच्या शेवटच्या दिवसानंतर सातव्या दिवसाच्या समाप्तीपूर्वी प्रदान करण्यात येईल.

(३) वेतन, केवळ बँक हस्तांतरणाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने वितरित करण्यात येईल.

(४) कंत्राटी कामगारांच्या वेतनातून कोणत्याही प्रकारची कपात केली जाणार नाही; मात्र, राज्य शासनाद्वारे विनिर्दिष्ट केलेल्या सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे निर्दिष्ट केलेली कपात किंवा वेतन संहिता, २०१९ (२०१९ चा २९) खालील अनुज्ञेय असलेली कपात कंत्राटदाराद्वारे कंत्राटी कामगारांच्या वेतनातून केली जाऊ शकते.

(५) कंत्राटी कामगारांच्या वेतन वाटपाचा कालावधी व दिनांक आणि वेळ दर्शवणारी नोटीस कामाच्या ठिकाणी प्रदर्शित केली जाईल आणि त्याची एक प्रत कंत्राटदाराने मुख्य नियोक्त्याला इलेक्ट्रॉनिक पद्धतीने किंवा पोचपावती व्यक्तीद्वारे सादर करावी.

(६) प्रत्येक कंत्राटदाराने (५० पेक्षा कमी कंत्राटी कामगार असलेल्या कंत्राटदारांसह) **नमुना- ११ अ** मधील सहामाही विवरणपत्र संबंधित सहायक कामगार आयुक्तांकडे सहामाही संपल्यापासून तीस दिवसांच्या आत इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. सहामाहीचा कालावधी जानेवारी ते जून आणि जुलै ते डिसेंबर असा असेल.

(७) जर कंत्राटदार वेतन कालावधी संपल्याच्या सात दिवसांच्या आत कंत्राटी कामगारांना वेतन देण्यास अपयशी ठरला, तर मुख्य नियोक्त्याने आवश्यक ती कार्यवाही करून संबंधित कंत्राटी कामगारांना १५ दिवसांच्या आत पूर्ण वेतन किंवा देय असलेली उर्वरित थकबाकी प्रदान करावी व मुख्य नियोक्त्याने अशा प्रकारे प्रदान केलेली रक्कम कंत्राटदाराकडून कोणत्याही करारानुसार कंत्राटदाराला देय असलेल्या रकमेतून कपात करून, कंत्राटदाराकडून येणे असलेले कर्ज म्हणून किंवा मुख्य नियोक्त्याकडे जमा असलेल्या कंत्राटदाराच्या सुरक्षा अनामत रकमेतून वसूल करावी.

(८) आस्थापनेच्या प्रत्येक मुख्य नियोक्त्याने प्रत्येक कॅलेंडर वर्ष संपल्यानंतर १ फेब्रुवारी पूर्वी **नमुना-११ ब** मध्ये वार्षिक विवरणपत्र संबंधित प्राधिकारी व सहायक कामगार आयुक्तांकडे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. विशिष्ट परिणाम साध्य करण्यासाठी घेतलेल्या कंत्राटांच्या बाबतीत ही अट लागू नाही.

३५. कलम ५५ च्या पोट-कलम (४) अन्वये कंत्राटदाराच्या सुरक्षा अनामत रकमेतून वेतन प्रदान करणे.-जर कंत्राटदार किंवा मुख्य नियोक्ता, कामावर ठेवलेल्या कंत्राटी कामगारांना वेतन, किमान वेतन किंवा कोणत्याही वैधानिक कायदेशीर देणी प्रदान करीत नसेल तर, सहायक कामगार आयुक्त, चौकशी करील किंवा चौकशी करण्याची व्यवस्था करील आणि कंत्राटदारास व मुख्य नियोक्त्यास बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर, कंत्राटदाराने सुरक्षा अनामत रक्कम म्हणून जमा केलेल्या रकमेतून अशा वेतनाची, कोणतीही असल्यास, रक्कम प्रदान करण्याचे आदेश पारित करील. कंत्राटदार, पंधरा दिवसांच्या आत सुरक्षा अनामत रक्कम पुन्हा जमा करील अन्यथा त्याची अनुज्ञप्ती निलंबित करण्यात येईल आणि देय रक्कम, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करण्यात येईल.

३६. कलम ५६ खालील अनुभवाचे प्रमाणपत्र.- प्रत्येक संबंधित कंत्राटदार, मागणी केल्यावर, कंत्राटी कामगारांना नमुना-अठरामध्ये अनुभवाचे प्रमाणपत्र देईल.

३७. कलम ५७ च्या पोट-कलम (२) च्या खंड (ख) अन्वये कंत्राटी कामगारांच्या रोजगारावर मनाई.-

(क) संहितेखालील किंवा या नियमांखालील कंत्राटी कामगारांच्या भागात काहीही समाविष्ट केले

असले तरीही, संहितेच्या कलम ५७ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे कोणत्याही आस्थापनेच्या मुख्य कार्यांमध्ये कंत्राटी कामगारास कामावर ठेवण्यास मनाई असेल, तथापि, जर एखाद्या आस्थापनेचे कोणतेही कार्य हे, मुख्य कार्य आहे किंवा कसे या संबंधी प्रश्न उद्भवला तर, व्यथित पक्षकार, आधारभूत दस्तऐवजांसह कारणे देवून महाराष्ट्र शासनाकडे अर्ज करील.

(ख) राज्य शासनाला, असा कोणताही प्रश्न स्वतःहून किंवा अर्ज कामगार आयुक्तांना विचारार्थ पाठवता येईल, ते त्यांच्याकडे असलेल्या संबंधित पुराव्याच्या आधारे किंवा त्या सयोग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, तीन महिन्यांच्या आत, राज्य शासनाला अहवाल सादर करील आणि त्यानंतर, राज्य शासन, सहा महिन्यांच्या आत, अशा प्रश्नावर निर्णय घेईल.

प्रकरण-नऊ

आंतरराज्यीय स्थलांतरित कामगार

३८. कलम ६१ अन्वये आंतरराज्यीय स्थलांतरित कामगारांना प्रवास भत्ता.- नियोक्ता, पुढील प्रसंगी, आंतरराज्यीय स्थलांतरित कामगारांना, कामाच्या ठिकाणापासून ते त्यांच्या मूळ राज्यातील निवासस्थानाच्या ठिकाणापर्यंत येण्या व जाण्याच्या प्रवासाच्या भाड्यापोटी एकतर, रेल्वेने (द्वितीयशयन कक्षापेक्षा कमी नसेल इतके) किंवा बसने किंवा प्रवासी वाहतुकीच्या इतर कोणत्याही साधनाद्वारे, जी सर्वात कमी खर्चीक असेल ती रक्कम प्रदान करील:-

(क) जर त्याने मागील बारा महिन्यांत संबंधित आस्थापनेमध्ये (आस्थापनांमध्ये) एकशे ऐंशी दिवसांपेक्षा कमी कालावधीसाठी काम केले असेल तर:

परंतु, आंतरराज्यीय स्थलांतरित कामगारास बारा महिन्यांतून एकदा प्रवास भत्ता दिला जाईल.

(ख) जर आंतरराज्यीय स्थलांतरित कामगाराने नोकरीच्या कालावधीच्या दरम्यानच्या काळात नियोक्ता बदलल्यास आणि त्याच्यापूर्वीच्या नियोक्त्याकडून प्रवास भत्ता घेतलेला नसेल तर, आंतरराज्यीय स्थलांतरित कामगाराने दिलेल्या प्रमाणपत्राच्या आधारावर, आंतरराज्यीय स्थलांतरित कामगार सध्या जेथे काम करीत आहे आणि अशा कामगाराने मागील नियोक्त्याकडे व्यतीत केलेल्या कालावधीसह मागील बारा महिन्यांत एकशे ऐंशी दिवस पूर्ण केले असतील तर, सध्याचा नियोक्ता, वर नमूद केल्याप्रमाणे प्रवास भत्ता देण्यास जबाबदार असेल.

३९. कलम ६३ अन्वये आंतरराज्यीय स्थलांतरित कामगारांसाठी टोल फ्री हेल्पलाइन क्रमांक स्थापित करणे.-

(१) आंतरराज्यीय स्थलांतरित कामगारांच्या सुरक्षिततेचे व तक्रारींचे निराकरण करण्यासाठी केंद्रीय कामगार व रोजगार मंत्रालयाचे महासंचालक, कामगार कल्याण संस्था यांच्याद्वारे टोल-फ्री हेल्पलाइन क्रमांक पुरविण्यात येईल.

(२) पोट-नियम (१) अन्वये पुरविलेला असा टोल-फ्री हेल्पलाइन क्रमांक, प्रत्येक नियोक्त्याद्वारे किंवा भोगवटाद्वारे आस्थापनेच्या प्रदर्शक फलकावर मराठी मध्ये, हिंदी मध्ये व आस्थापनेतील बहुसंख्य कामगारांना समजत असलेल्या भाषेत प्रदर्शित करण्यात येईल.

४०. कलम ६४ अन्वये आंतरराज्यीय स्थलांतरित कामगारांचा अभ्यास.- राज्य शासन, आंतरराज्यीय स्थलांतरित कामगारांची सुरक्षा, आरोग्य व कल्याण यांस चालना देण्यासाठी

करावयाचा अभ्यास निश्चित करू शकेल. जेथे आवश्यक असेल तेथे, राज्य शासनास, आंतरराज्यीय स्थलांतरित कामगारांची सुरक्षा, आरोग्य व कल्याण यामध्ये सहभागी असलेल्या तज्ज्ञ संस्थांचा सल्ला देखील घेता येईल.

प्रकरण - दहा

दक - श्राव्य कामगार (ऑडिओ-व्हिज्युअल वर्कर)

४१. कलम ६६ च्या पोट -कलम (२) च्या खंड (क) खालील दक-श्राव्य कामगारांसाठी करारनामा.- (१) निर्मात्यासोबत दक-श्राव्य कामगारांनी करावयाच्या करारनाम्याचा नमुना, नमुना-एकोणीस मध्ये असेल.

(२) राज्य शासनाद्वारे प्राधिकृत करण्यात येईल अशा सक्षम प्राधिकरणाकडे करारनामा नोंदवण्यात येईल.

४२. कलम ६६ च्या पोट -कलम (१) अन्वये समेट अधिकाऱ्याकडे किंवा न्यायाधिकरणाकडे विवाद निर्दिष्ट करण्याची कार्यपद्धती.- समेट अधिकाऱ्याकडे किंवा न्यायाधिकरणाकडे विवाद निर्दिष्ट करण्याची कार्यपद्धती, औद्योगिक संबंध संहिता, २०२० (२०२० चा ३५) आणि त्या खाली केलेले नियम यांच्याशी सुसंगत असेल.

प्रकरण - अकरा

बिडी व सिगार निर्मितीसाठी औद्योगिक परिवास्तूंची अनुज्ञप्ती

४३. कलम ७४ अन्वये अनुज्ञप्ती देण्याच्या अर्जाचा नमुना व अनुज्ञप्ती शुल्क.-

(१) कोणतेही ठिकाण किंवा परिवास्तू, औद्योगिक परिवास्तू म्हणून वापरण्यासाठी किंवा वापरण्याची परवानगी देण्यासाठी संहितेच्या कलम ११९ च्या पोट-कलम (१) खालील प्रत्येक अर्ज, नमुना-चौदा मध्ये राज्य पोर्टलवर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने करण्यात येईल आणि त्या सोबत, खालील तक्त्यामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे यथोचित शुल्काचे ऑनलाइन प्रदान करण्यात येईल:

अनुज्ञप्ती शुल्क तक्ता

कर्मचाऱ्यांची संख्या	२० पर्यंत	२१ ते ५० पर्यंत	५१ ते १०० पर्यंत	१०१ ते २५० पर्यंत	२५१ ते ५०० पर्यंत	५०१ ते ७५० पर्यंत	७५१ व त्यापेक्षा अधिक
प्रदेय असलेले शुल्क	१००	२००	७५०	१५००	२५००	५०००	७५००

संहितेच्या व्याप्तीमधील प्रत्येक औद्योगिक परिवास्तूचा नियोक्ता, व्यवसाय प्रारंभाच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, इलेक्ट्रॉनिक पद्धतीने राज्य सरकारच्या पोर्टलवर अर्ज सादर करील.

(२) अर्जासोबत पुढील दस्तऐवज जोडण्यात येतील:-

(क) पुढील गोष्टी दर्शविणारे नकाशे: -

(एक) अशा ठिकाणाची किंवा परिवास्तूची जागा, उत्पादन प्रक्रियेसाठी वापरण्यात येणारे त्यातील क्षेत्र आणि आस्थापनेच्या परिसरातील इमारतींच्या संरचना, रस्ते, नाले व तत्सम गोष्टी यांसह अशा ठिकाणाच्या किंवा परिवास्तूच्या लगत असलेला सभोवतालचा परिसर; आणि

(दोन) ज्या कोणत्याही उत्पादन प्रक्रियेसाठी वापरण्याचे उद्देशित आहेत अशा विविध इमारतींची उंची व आवश्यक काट-छेद (क्रॉस-सेक्शन), त्यामधील किंवा त्यासंबंधातील नैसर्गिक प्रकाश योजना, वायुविजन (वेंटिलेशन), आग लागल्यास सुटकेचे मार्ग, वापरण्यात येणाऱ्या संयंत्राचे व यंत्र सामग्रीचे स्थान आणि आपत्कालीन मार्ग;

(ख) जोडपत्र-ब मधील स्वयं-घोषणापत्र;

(ग) जोडपत्र-क मधील स्वयं-साक्षांकन घोषणापत्र.

४४. नूतनीकरण करण्याचा अर्ज.- संहितेच्या कलम ११९ खालील नूतनीकरण करण्याचा प्रत्येक अर्ज, नमुना-चौदा मध्ये राज्य पोर्टल वर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने करण्यात येईल. अर्जासोबत, पुढील दस्तऐवज जोडण्यात येतील:-

(क) नूतनीकरण करण्याची मागणी केलेली अनुज्ञप्ती;

(ख) नियम ४३ अन्वये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अनुज्ञप्तीचे नूतनीकरण करण्याकरिता प्रदान केलेल्या यथोचित शुल्काची ऑनलाईन पावती.

४५. अनुज्ञप्ती देण्याच्या किंवा त्याचे नूतनीकरण करण्याच्या बाबतीतील विवक्षित तरतुदी.-

(१) अनुज्ञप्ती देण्याचा किंवा त्याचे नूतनीकरण करण्याचा अर्ज, जर नमुना-चौदा मध्ये असेल आणि नियम ४३ किंवा, यथास्थिति, नियम ४४ च्या शर्तींचे सर्व बाबतीत पालन करीत असेल तर, तो यथोचितपणे करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

(२) अनुज्ञप्ती प्राधिकारी, अनुज्ञप्ती देण्याचा किंवा त्याचे नूतनीकरण करण्याचा किंवा अनुज्ञप्तीच्या तपशिलांमध्ये बदल करण्याचा अर्ज, तो मिळाल्याच्या तारखेपासून कामकाजाच्या सात दिवसांच्या आत, निकालात काढील.

४६. अनुज्ञप्तीचा नमुना आणि त्याच्या अटी व शर्ती.-

(१) संहितेच्या कलम ११९ खालील अनुज्ञप्ती, नमुना-सतरा मध्ये विहित केल्याप्रमाणे असेल.

(२) संहितेच्या कलम ११९ अन्वये दिलेली किंवा नूतनीकरण केलेली प्रत्येक अनुज्ञप्ती,पुढील शर्तींच्या अधीन असेल, म्हणजेच:-

(एक) अनुज्ञप्तीमध्ये ज्या प्रयोजनार्थ औद्योगिक परिवास्तु विनिर्दिष्ट केलेली आहे त्या औद्योगिक परिवास्तुच्या त्या भागातच केवळ उत्पादन प्रक्रिया केली जाईल;

(दोन) औद्योगिक परिवास्तुत काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांची कमाल संख्या, कोणत्याही दिवशी अनुज्ञप्तीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या संख्येपेक्षा अधिक असणार नाही;

(तीन) अनुज्ञप्ती प्राधिकाऱ्याची लेखी पूर्व परवानगी असल्याखेरीज, औद्योगिक परिवास्तुत वाढ करण्यात येणार नाही आणि तत्सम परवानगी असल्याखेरीज, अशा परिवास्तुवरील कोणत्याही इमारतीमध्ये संरचनात्मक बदल केले जाणार नाहीत;

(चार) अनुज्ञप्ती हस्तांतरणयोग्य असणार नाही;

(पाच) अनुज्ञप्ती देण्यासाठी किंवा अनुज्ञप्तीच्या नूतनीकरणासाठी इलेक्ट्रॉनिक पद्धतीने प्रदान केलेले शुल्क, परतावायोग्य असणार नाही.

(३) कलम ११९ अन्वये दिलेली अनुज्ञप्ती, केवळ पाच वर्षांसाठी वैध असेल आणि त्यानंतर तिचे नूतनीकरण करता येईल.

४७. अनुज्ञप्तीची दुरुस्ती.- (१) संहितेच्या कलम ११९ अन्वये दिलेल्या अनुज्ञप्तीत, संबंधित जिल्ह्यासाठी अधिसूचित केलेल्या अनुज्ञप्ती प्राधिकाऱ्याकडून सुधारणा करता येईल.

(२) अनुज्ञप्तीधारकाने, त्याच्या अनुज्ञप्तीमध्ये पुढील बाबतीत सुधारणा करणे आवश्यक असेल:-

(क) औद्योगिक परिवास्तूच्या नावात बदल झाला असेल तर; किंवा

(ख) औद्योगिक परिवास्तू ज्या जागेवर आहे त्या जागेत बदल झाला असेल तर; किंवा

(ग) ज्या औद्योगिक परिवास्तुला अनुज्ञप्ती दिलेली आहे त्या औद्योगिक परिवास्तु मध्ये कामं करणाऱ्या व्यक्तींची संख्या अनुज्ञप्ती मध्ये नमूद केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक असेल तर

(३) ज्या अनुज्ञप्ती धारकाच्या अनुज्ञप्तीमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे तो अनुज्ञप्ती धारक, सुधारणेचे स्वरूप व त्याची कारणे नमूद करून संबंधित जिल्ह्यासाठी अधिसूचित केलेल्या अनुज्ञप्ती प्राधिकाऱ्याकडे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने अर्ज सादर करील.

(४) अशा अर्जावर, इलेक्ट्रॉनिक पद्धतीने अर्ज मिळाल्यापासून कामकाजाच्या सात दिवसांच्या आत, निर्णय घेण्यात येईल.

४८. कलम ७५ अंतर्गत अपील.- संहितेच्या कलम ७५ अंतर्गत अपील,-

(क) अनुज्ञप्ती प्राधिकाऱ्याचा आदेश मिळाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, विभागीय अपर कामगार आयुक्ताकडे किंवा कामगार उपायुक्ताकडे राज्य पोर्टल वर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने अपील करण्यात येईल;

(ख) संहितेच्या कलम ७५ अन्वये अपील करण्यासाठी, रुपये पाचशे इतके शुल्क, इलेक्ट्रॉनिक पद्धतीने प्रदान करण्यात आले आहे हे दर्शविणारी पावती सोबत जोडण्यात येईल, हे शुल्क ना - परतावा असेल.

४९. कर्मचाऱ्यांना औद्योगिक परिवास्तुबाहेर काम करण्याची परवानगी.-

(१) औद्योगिक परिवास्तुच्या बाहेर कर्मचाऱ्यांना बिडीची किंवा तंबाखूची पाने वळण्याची किंवा कापण्याची परवानगी देण्यासाठी परवाना मिळण्याकरिता कलम ७६ च्या पोट-कलम (१) खालील

प्रत्येक अर्ज, या नियमांच्या प्रारंभापासून कामकाजाच्या पंधरा दिवसांच्या आत, विहित केलेल्या नमुना-वीस मध्ये इलेक्ट्रॉनिक पद्धतीने करण्यात येईल.

(२) अर्जासोबत, परवानगी मागणाऱ्या कर्मचाऱ्यांची यादी, जोडपत्र- ड मध्ये जोडण्यात येईल.

(३) विभागीय अपर कामगार आयुक्त किंवा विभागीय कामगार उपायुक्त, पोट-नियम (१) खालील अर्ज प्राप्त झाल्यावर कामाच्या पंधरा दिवसांच्या आत, अर्ज निकालात काढील.

(४) कलम ७६ अन्वये दिलेला परवाना, केवळ एका वर्षासाठी वैध असेल आणि त्यानंतर पोट-नियम (१) मध्ये निर्धारित केलेल्या कार्यपद्धतीने त्याचे नूतनीकरण करता येईल आणि त्यात सुधारणा करता येऊ शकेल.

५०. परवानगी मागण्याच्या अटी व शर्ती.-

(क) नियोक्ता, परवानगी दिलेले कामगार मागणी करतील त्या प्रमाणे व तेव्हा, पुरेसा व नियमित कच्चा माल पुरवील.

(ख) कच्चा माल पुरवताना, पुरुष किंवा महिला किंवा तृतीयपंथी कर्मचाऱ्यांमध्ये भेदभाव करता येणार नाही.

(ग) कोणत्याही परिस्थितीत १४ वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलाला हे काम देता येणार नाही.

(घ) परवानगी असलेल्या कामगाराला तंबाखूचे अचूक वजन व विडीच्या पानांचे अचूक प्रमाण लेखी स्वरूपात दिले जाईल.

(ङ) अशा परवानगी दिलेल्या कामगारांना, किमान वेतनाच्या विहित दरापेक्षा कमी वेतन प्रदान करण्यात येणार नाही.

(च) कच्चा माल पुरविण्यासाठी परवानगी दिलेल्या कामगारांकडून कोणतीही ठेव रक्कम घेण्यात येणार नाही.

(छ) विमा, भविष्यनिर्वाह निधी, उपदान (ग्रॅच्युइटी), बोनस, वेतनासह रजा, वेतनी सुट्ट्या, इत्यादी सारखे सर्व वैधानिक सामाजिक सुरक्षा लाभ, परवानगी दिलेल्या सर्व कामगारांना देण्यात येतील.

(ज) बिडी बनवणाऱ्या औद्योगिक परिवास्तुचा तसेच परवानगी दिलेल्या कामगारांच्या निवासस्थानाचा अपघाती विमा काढल्याची नियोक्ता खात्री करील.

५१. बाहेरील कामाचा अभिलेख.- संहितेच्या कलम ७६ च्या पोट-कलम (२) अन्वये परवानगी दिलेल्या औद्योगिक परिवास्तुच्या बाहेर केलेल्या कामाचा अभिलेख, नियोक्ता, नमुना-एकवीस मध्ये ठेवील.

प्रकरण - बारा

रोप मळा

५२. कामगारांकरिता निवासव्यवस्था.- प्रत्येक नियोक्ता, रोप मळ्यात राहणारे कामगार व त्याचे कुटुंब यांच्यासाठी, शक्य असेल तेथवर, कामाच्या ठिकाणाजवळ निवास व्यवस्था पुरवील.

५३. निवासव्यवस्थेचे प्रमाण व विनिर्देशके.- रोप मळ्यातील कामगारांच्या सर्व निवास व्यवस्थांमध्ये, महिला कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र खोल्या असतील. प्रत्येक खोलीमध्ये ताजी हवा खेळती राहावी म्हणून पर्याप्त वायुवीजन व्यवस्था करण्यासाठी व ठेवण्यासाठी प्रभावी व सुयोग्य तरतूद करण्यात येईल आणि तेथे पुरेशा व सुयोग्य नैसर्गिक व कृत्रिम प्रकाश योजनेची देखील तरतूद करण्यात येईल व ठेवण्यात येईल. खोल्यांचे किंवा अन्य सुयोग्य पर्यायी निवास स्थानाचे परिक्षेत्र असे असेल की, जेणेकरून खोलीचा वापर करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीसाठी स्वयंपाक घर व स्वच्छतागृह यांचे क्षेत्र वगळून किमान दहा चौरस मीटरचे चटई क्षेत्र पुरविता येईल. निवासस्थानाचे बांधकाम असे असावे की, ज्यामुळे ऊन, वारा, पाऊस या पासून पुरेसे संरक्षण होईल आणि जमिनीचा पृष्ठभाग हा सपाट, कडक व अच्छिद्र असेल.

५४. निवासव्यवस्थेची जागा.-

(१) निवासीव्यवस्था, कोरडया, तसेच पाण्याचा योग्य निचरा होणा-या जमिनीवर असावी, ती रोप मळ्यापासून आवश्यक अंतरावर असावी व वाजवी अंतरावर पिण्याचे पाणी असावे. पाणथळ क्षेत्रांमध्ये, निवासस्थाने, पाणथळ व दलदलीच्या क्षेत्रापासून सुरक्षित अंतरावर आणि उच्चतम पूर पातळीच्यावर असावीत.

(२) ज्या क्षेत्रामध्ये निवासस्थाने पुरविलेली आहेत त्या क्षेत्रामध्ये व त्या सभोवताली पुरेशा प्रकाशाची व्यवस्था करण्यात येईल.

(३) नियोक्ता, ज्या क्षेत्रामध्ये निवासस्थाने स्थित आहेत त्या क्षेत्राकडे जाणारे पोहोच मार्ग व पथ तसेच त्या क्षेत्रातील मल:निसारण व जल:निसारण व्यवस्था सुस्थितीत ठेवील.

(४) नियोक्ता, जेथे कामगारांची घरे आहेत तेथील रोप मळ्याच्या भागामध्ये जनतेला मुक्त प्रवेश करण्यास नकार देणार नाही.

(५) नियोक्ता, सर्व निवासव्यवस्थेचा परिसर कचरा व घाण मुक्त ठेवील आणि शौचालय व गटारे दररोज स्वच्छ करील आणि त्या परिसरातील जवळील सर्व कचरा व घाण दररोज गोळा करुन, काढून व आरोग्यदायी पध्दतीने त्याची विल्हेवाट लावील.

५५. निवासस्थानांची देखभाल.-

(१) नियोक्ता, कामगारांच्या निवास व्यवस्थेसाठी पुरविलेली सर्व निवासस्थाने, स्वतःच्या खर्चाने, सुरक्षित व बळकट स्थितीत ठेवील आणि वार्षिक देखभाल व आवश्यक आणि वेळोवेळी आवश्यक असेल अशी अन्य दुरुस्ती करील.

(२) निवासस्थानाचा वापर करणारा कामगार, आणि या संहिते अन्वये नियुक्त केलेला निरीक्षक-सह-सुविधाकार, कामगाराचे आरोग्य व सुरक्षेच्या दृष्टीने जे धोकादायक असतील असे निवासस्थानाच्या स्थितीतील कोणतेही दोष, नियोक्त्याच्या निदर्शनास आणून देतील.जेव्हा निरीक्षक-सह-सुविधाकार असे दोष नियोक्त्याच्या निदर्शनास आणून देईल तेव्हा, कोणताही विलंब न करता, ते दोष दुरुस्त करणे हे, नियोक्त्याचे कर्तव्य असेल.

(३) नियोक्ता, किमान वर्षातून एकदा सर्व निवासस्थानांना चुन्याचा रंग लावील आणि सर्व दरवाजे, खिडक्या तसेच लाकडी संरचनेस तीन वर्षातून किमान एकदा वॉर्निश लावील किंवा रंग देईल. ज्या तारखांना चुन्याचा रंग लावलेला आहे किंवा रंगकाम केलेले होते त्या तारखांचा अभिलेख, इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील नमुना १० मधील नोंदवहीमध्ये ठेवण्यात येईल.

५६. निवासव्यवस्था भाडेमुक्त असावे.- १) रोप मळ्यामध्ये राहणाऱ्या कामगारांना व त्यांच्या कुटुंबीयांना पुरविलेल्या निवास व्यवस्थेसाठी नियोक्त्याकडून कोणतेही भाडे आकारण्यात येणार नाही.

२) ज्या रोप मळ्यामध्ये मागील बारा महिन्यांच्या कोणत्याही दिवशी पन्नास किंवा त्यापेक्षा अधिक कामगार (कंत्राटी कामगारांसहित) काम करीत आहेत किंवा काम करीत होते अशा रोपमाळ्याचा प्रत्येक नियोक्ता, पाळणाघराची सुविधा पुरवील.

५७. कामगारांच्या मुलांना शैक्षणिक सुविधा.-

(१) (क) प्रत्येक नियोक्ता, जर त्याच्या रोप मळ्यामधील सहा ते बारा वर्षे वयाच्या बालकांची संख्या, पंचवीसपेक्षा अधिक असेल तर, अशा बालकांना प्राथमिक शिक्षण देण्यासाठी एक किंवा अधिक प्राथमिक शाळा किंवा शाळा पुरवील व चालवील.

(ख) रोप मळ्याचा प्रत्येक नियोक्ता, त्याच्या रोप मळ्यामध्ये दवाखान्याची तरतूद करील. रोप मळ्यांमध्ये वाटिका रुग्णालये व गट रुग्णालये यांसारख्या दोन प्रकारची रुग्णालये असतील-

(एक) वाटिका रुग्णालये ही, बाहय रुग्णांवर उपचार, कोणत्याही विशेष रोगनिदानाची अथवा उपचाराची आवश्यकता नसणारे अंतररुग्ण, संसर्गजन्य रोगाची लागण झालेले रुग्ण, प्रसूती, शिशूंची व बाळांची साधी प्रसुतीपूर्व व प्रसुतीत्तर देखभाल आणि कामगारांची नियतकालिक तपासणी करतील;

(दोन) गट रुग्णालय ही, सर्वसाधारणपणे आकस्मितपणे उद्भवलेल्या, परंतु नियमित उपचाराची गरज नसलेल्या सर्व प्रकारच्या रुग्णांची कार्यक्षमपणे तपासणी करण्यासाठी सक्षम असतील. गट रुग्णालयांमधील प्रदेश, केवळ वाटिका रुग्णालयांच्या डॉक्टरांच्या शिफारशीवरूनच देण्यात येईल. उपकरणे व औषधे.- प्रत्येक दवाखाना, वाटिका रुग्णालय व गट रुग्णालय, राज्य शासनाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येतील अशी उपकरणे व औषधे, इत्यादी ठेवतील.

(ग) वैद्यकिय अभिलेख.- प्रत्येक दवाखान्याचा, वाटिका रुग्णालयाचा किंवा गट रुग्णालयाचा प्रभारी वैद्यकीय अधिकारी, या प्रयोजनासाठी राज्य शासनाद्वारे विहित करण्यात येईल त्याप्रमाणे प्रत्येक रुग्णाच्या बाबतीत अभिलेख ठेवील व तो अद्ययावत करील. विहीत केल्यानुसार अद्यावत ठेवतील; आणि

(२) वैद्यकीय भांडार दुकानांच्या नियमांबाबत राज्य शासनाने केलेल्या नियमांचे पालन करील.

५८. मनोरंजनाच्या सुविधा.- (१) प्रत्येक नियोक्ता,-

(एक) राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेने राज्याच्या कामगार आयुक्ताने विनिर्दिष्ट केल्यानुसार, निवासी कामगारांच्या प्रत्येकी एकशे पंच्याहत्तर कुटुंबांसाठी किंवा त्याच्या भागासाठी एक या प्रमाणात, प्रौढ कामगारांकरिता व त्यांच्या मुलांकरिता रेडिओ व दूर चित्रवाणी संच आणि अंतर्गत खेळ यांची तरतूद असलेले मनोरंजन केंद्र असावे,प्रत्येक रोप मळ्यासाठी किंवा त्याच्या बाह्य वाटिकेसाठी किमान एक मनोरंजन केंद्र असावे.

(दोन) जर वाजवी अंतरावर पर्याप्त मोकळी सपाट जागा उपलब्ध असेल तर, प्रौढ कामगारांकरिता व त्यांच्या मुलांकरिता बाहय मैदानी खेळासाठी आवश्यक असलेल्या क्रीडा साधनसामग्रीसह खेळाचे मैदान किंवा मैदाने, पूरवील व ते चालवील.

(२) पुरविलेले व चालविलेले प्रत्येक मनोरंजन केंद्र, शक्य असेल तेथवर, कामगारांच्या निवासस्थानाजवळ सोयीस्कर जागी स्थित असेल.

५९. रोप मळ्यामधील कीटकनाशके, जंतुनाशके, रसायने व विषारी पदार्थ यांचा वापर, हाताळणी, वाहतूक व साठा करणे.-

(१) अन्नधान्य, जनावरांचे खाद्य किंवा पिण्याचे पाणी अशा रीतीने साठा करण्यात येईल , कि कोणतेही किटकनाशके, जंतुनाशके, रसायने व विषारी पदार्थयांची वाहतूक यांच्या थेट संपर्कात येणार नाही

(२) जर कोणतेही किटकनाशक, जंतूनाशके, रसायने व विषारी पदार्थांची, वाहतूक किंवा साठवणूक करताना गळती झाल्याचे आढळून आले असेल तर, माती किंवा पाणी विषारी होण्यापासून व त्याचे प्रदूषण होण्यापासून प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक असतील अशा उपाययोजना तातडीने हाती घेणे ही नियोक्त्याची जबाबदारी असेल.

(३) किटकनाशके, जंतुनाशके, रसायने, विषारी पदार्थ असलेली अवेष्टने (पॅकेजेस), स्वतंत्र खोलीमध्ये किंवा असे पदार्थ साठवण्यासाठी वापर केल्या जाणाऱ्या जागेमध्ये साठवण्यात येतील अथवा कीटकनाशकांचे प्रमाण व स्वरूप यावर अवलंबून राहून, कुलूप व किल्ली असलेल्या स्वतंत्र कपाटामध्ये ठेवण्यात येतील.

(४) ज्या जागेत किंवा खोलीत किटकनाशके, जंतुनाशके, रसायने व विषारी पदार्थ यांची साठवणूक करण्यासाठी असलेल्या खोल्या किंवा जागा, योग्य आकाराच्या, योग्य प्रकारे बांधलेल्या, कोरड्या, पुरेशी प्रकाश योजना व वायुवीजन असलेल्या असतील.

६०. किटकनाशके, जंतुनाशके, रसायने व विषारी पदार्थ यांची हाताळणी करण्यामध्ये महिला, बाल किंवा किशोरवयीन कामगार यांना कामावर ठेवण्यास मनाई किंवा निर्बंध.- किटकनाशके, जंतुनाशके, रसायने व विषारी पदार्थ यांची हाताळणी किंवा साठवणूक किंवा वाहतूक करण्याच्या कामामध्ये, महिला कामगार अथवा बाल किंवा किशोरवयीन कामगार यांना कामावर ठेवण्यास परवानगी असणार नाही.

६१. पर्यवेक्षकांची नियुक्ती व अर्हता.- किटकनाशके, जंतुनाशके, रसायने व विषारी पदार्थ यांचा वापर, हाताळणी, साठवणूक व वाहतूक, अशी व्यक्ती पुढील अर्हता धारण करील:-

(एक) ती, कृषीमधील किंवा विज्ञानामधील पदवीधर असेल, अथवा ती, मान्यताप्राप्त संस्थेने चालविलेल्या रसायने व विषारी पदार्थ यांची हाताळणी करण्याबाबचा प्रमाणपत्र पाठ्यक्रम धारण करीत असेल.

(दोन) नेमून दिलेल्या प्रशिक्षण संस्थेमधून तिला प्रशिक्षण देण्यात यावे.

(तीन) तिने, कामगारांना प्रथम उपचार व उपचार करण्यासाठी मान्यताप्राप्त संस्थेकडून वैध प्रमाणपत्र धारण केलेले असावे.

६२. कामगारांचे प्रशिक्षण.-

(१) किटकनाशके, जंतुनाशके, रसायने आणि विषारी पदार्थ हाताळणा-या कामगारांसाठी, सुरक्षेच्या खबरदारीचे पालन करणे आणि त्यांना पुरविलेली सुरक्षेची उपकरणे हाताळणे या बाबतचे सुयोग्य प्रशिक्षण, राज्य शासनाने, वेळोवेळी अधिसूचित केलेल्या संस्थेमध्ये देण्याची व्यवस्था करण्यात येईल.

(२) जे कामगार, कृषी रसायने व अन्य रसायनिक पदार्थांचा वापर वापर करतात, हाताळतात, वाहतूक करतात किंवा संपर्कात येतात अशा सर्व कामगारांना, किमान पुढील विषयांचे प्रशिक्षण दिले पाहिजे:-

(एक) सर्वसाधारण व्यावसायिक आरोग्य;

(दोन) कीटकनाशकांमध्ये वापरलेल्या पदार्थांचे सुत्रीकरण, नावे व जैविक परिणाम;

(तीन) संरक्षक पोषाख व उपकरणे यांचा योग्य वापर;

(चार) रसायनिक पदार्थांमुळे होणारे आरोग्याचे व पर्यावरणाचे नुकसान टाळण्याकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजना व उपाय, उपकरणे, वापरण्याचे तंत्र, चिन्हे, वैद्यकिय तपासणी, इत्यादी;

(पाच) विष बाधा झालेल्या किंवा रासायनिक पदार्थांच्या अनुचित प्रकारे संपर्कात आलेल्या रुग्णांकरिता कारवायाची आकस्मिक कार्यपध्दती, प्रथमोचार व वैद्यकिय उपचार;

(सहा) रासायनिक पदार्थ हाताळण्याचे तंत्र आणि कृषी रसायनांचा योग्य वापर;

(सात) कृषी रसायनांची सुरक्षीत हाताळणी व वाहतूक करण्यासाठी वाहिका; आणि

(आठ) रोप मळ्यांसाठी सुयोग्य असलेले अन्य आवश्यक प्रशिक्षण.

६३. कामगारांची नियतकालिक वैद्यकिय तपासणी.-

(१) जो कामगार किटकनाशके, जंतुनाशके, रसायने व विषारी पदार्थ यांची हाताळणी, देवाण घेवाण, फवारणी किंवा मिसळणी करण्याचे काम करीत असेल अशा प्रत्येक कामगाराची, कामावर ठेवण्याच्या वेळी, सुरुवातीला आणि त्यानंतर, सहा महिन्यांतून एकदा, याबाबतीत अधिसूचित केलेल्या रुग्णालयांमध्ये वैद्यकीय तपासणी करण्यात येईल.

(२) वैद्यकीय तपासणी व चाचण्या यांची, नमुना ७ नुसार नोंदणी करण्यात येईल.

(३) विषबाधेची लक्षण आढळणा-या प्रत्येक व्यक्तीची, तातडीने तपासणी करण्यात येईल व तिच्यावर योग्य उपचार करण्यात येईल.

६४. आरोग्य विषयक अभिलेख ठेवणे.- प्रत्येक नियोक्ता, सहामाही वैद्यकीय तपासणी अथवा अन्य कोणतेही तपासणी यासारखा, प्रत्येक कामगाराच्या आरोग्याचा अभिलेख ठेवील आणि आवश्यक असेल तेव्हा केलेली तो रोप मळ्यामध्ये ठेवण्यात येईल आणि प्रत्येक कामगाराला असा अभिलेख उपलब्ध असेल.

६५. धुवण, स्नान व स्वच्छतागृह सुविधा.-

(१) प्रत्येक नियोक्ता, जे कामगार, किटकनाशके, जंतुनाशके, रसायने व विषारी पदार्थ यांची हाताळणी करण्याचे काम करतात अशा कामगारांसाठी धुवण, स्नान व स्वच्छतागृह सुविधा पुरवील.

(२) संरक्षक पोषाख व उपकरणे:-

(क) किटकनाशके, जंतुनाशके, रसायने व विषारी पदार्थ हाताळणाऱ्या व्यक्तींना, त्यांचे काम करताना, ते वितरित करताना, मिसळताना, त्यांची फवारणी करताना, योग्य पोशाखामध्ये पर्याप्तपणे संरक्षित असतील.

(ख) असा संरक्षक पोषाख हा, किटकनाशके, रसायने व विषारी सुत्रीकरण यांचा कोणत्याही प्रकारे शिरकाव होण्यापासून प्रतिबंध व निरोध करणा-या साहित्य पासून तयार केलेला

असेल. सदर सामग्रीही धुण्या योग्य असावी, जेणे करुन विषारी पदार्थ हे वापरानंतर धुतले जातील. असे साहित्य धुण्यायोग्य असेल, जेणेकरून त्याच्या प्रत्येक वापरानंतर, त्यावरील विषारी घटक काढून टाकता येतील.

(ग) संरक्षक पोषाखाच्या संपूर्ण सुटमध्ये पुढील वस्त्रांचा अंर्तभाव असेल:-

(एक) शिरटोपासह बाहेरुन घालावयाचे संरक्षक कपडे;

(दोन) द्रवरोधक साहित्य पासून बनविलेले रबरी हातमोजे किंवा हाताच्या कोपरापर्यंत पोहोचतील असे संरक्षक हातमोजे;

(तीन) धूळरोधक चष्मा;

(चार) बूट;

(पाच) पुन्हा वापरता येण्याजोगे कापडी मास्क.

६६. किटकनाशके, जंतूनाशके, रसायने, विषारी पदार्थ यांची यादी प्रदर्शित करणे.- प्रत्येक नियोक्ता, केंद्र केंद्र सरकारने, किटकनाशके अधिनियम, १९६८ (१९६८ चा ४६) अन्वये वेळोवेळी अधिसूचित केलेली किटकनाशके, जंतुनाशके, रसायने व विषारी पदार्थ यांची यादी, रोप मळ्यामध्ये प्रदर्शित करील.

६७. खबरदारीच्या सूचना.- प्रत्येक नियोक्ता, रोप मळ्यामध्ये, जेथे किटकनाशके, जंतुनाशके, रसायने व विषारी पदार्थ हाताळले जातात अशा ठिकाणी किंवा त्या जवळ, पुढील खबरदारीच्या सुचना प्रदर्शित करील:-

(एक) संपूर्ण पायघोळ झगा, मोजे, रबरी गमबुट, रुंद मोठी हॅट यासारख्या संरक्षक कपड्यांचा वापर करा. वापर करावा.

(दोन) किटकनाशके व जंतुनाशके असलेले कपडे वापरु नका.

(तीन) साबणाने व पाण्याने स्वच्छ धुवून संरक्षक पोषाख स्वच्छ करा.

(चार) लहान मुले, किशोरवयीन मुले, वयस्कर व्यक्ती, आजारी व्यक्ती व गर्भवती महिला आणि परिपोषण करणाऱ्या माता यांना किटकनाशके, जंतुनाशके, रसायने व विषारी पदार्थ हाताळाण्यास परवानगी देऊ नका.

(पाच) किटकनाशके, जंतुनाशके, रसायने व विषारी पदार्थ हाताळत असताना, खाण्यास, पिण्यास, धुम्रपानास व चघळण्यास मनाई आहे.

(सहा) तुंबलेल्या तोटीस तोंड लावून फुंकू नका.

(सात) गळक्या फवारणी यंत्राचा वापर करु नका. तसेच त्वचा, तोंड व डोळे यांचा संपर्क होण्यापासून टाळा.

(आठ) शेतामध्ये दुर्लक्षित कीटकनाशके अंत:श्वसन करू नका.

(नऊ) वा-याच्या प्रवाहा विरुध्द किटकनाशके, जंतुनाशके, रसायने व विषारी पदार्थ यांची फवारणी करु नका.

(दहा) शेतामध्ये दुर्लक्षित कीटकनाशके व जंतुनाशके ठेवू नका.

(अकरा) उत्पादकाने सुचविलेल्या कालावधीसाठी कीटकनाशके व जंतूनाशके फवारणी केलेल्या क्षेत्रात माणसांना व जनावरांना प्रवेश देऊ नका.

(बारा) विहीर किंवा वाहते झरे याजवळ कीटकनाशके व जंतुनाशके यांचे कंटेनर स्वच्छ करू नका.

(तेरा) स्वच्छपाणी, साबण व टॉवेल वापराकरिता तयार ठेवा.

(चौदा) जेवणापूर्वी, पाणी पिण्यापूर्वी, धुम्रपान करण्यापूर्वी किंवा चघळण्यापूर्वी आणि काम संपल्यानंतर हाथ व उघडे अंग साबणाने व पाण्याने स्वच्छ धुवावेत.

(पंधरा) लहान मुलांच्या व अन्य अनाधिकृत व्यक्तींच्या व्यक्तीच्या हाती लागणार नाही अशा रीतीने, किटकनाशके, जंतुनाशके, रसायने व विषारी पदार्थ भांडार कक्षामध्ये कुलूप बंद ठेवावेत.

(सोळा) फवारणी केलेल्या क्षेत्रात प्रवेश करु नये. उत्पादकाने सूचना केल्याप्रमाणे, वनस्पतीनाशकासह सर्व किटकनाशके, जंतुनाशके, रसायने व विषारी पदार्थ फवारलेल्या क्षेत्रात पुन: प्रवेशाच्या कालावधीचे पालन करावे.

(सतरा) किटकनाशके, जंतुनाशके, रसायने व विषारी पदार्थ, त्यांच्या मूळ लेबल लावलेल्या डब्यात (कंटेनरमध्ये) ठेवावेत.

(अठरा) तातडीच्या वापराखेरीज, किटकनाशके, जंतुनाशके, रसायने व विषारी पदार्थ, लेबल नसलेल्या डब्यात (कंटेनरमध्ये) ओतून ठेवू नये.

(एकोणीस) पूर्णत: रिकामे करुन व नीट धुवून अशा कंटेनरची सरक्षितपणे विल्हेवाट लावावी. पाण्याच्या स्त्रोतापासून दूरवर ते पुरुन ठेवता येतील.

(वीस) जर किटकनाशके, जंतुनाशके, रसायने व विषारी पदार्थाचे अंश काढून टाकणे शक्य नसेल तर, अशा डब्याचा (कंटेनरचा) अन्य प्रयोजनांसाठी पुन्हा वापर करू नये.

प्रकरण-तेरा

अपराधांचे प्रशमन करणे

६८. कलम ११४ च्या पोट-कलम (१) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या प्राधिकृत अधिकाऱ्याद्वारे अपराधांचे प्रशमन करण्याची पद्धत .-

(१) संहितेच्या कलम ११४ च्या पोट-कलम (१) अन्वये **अपराधांचे प्रशमन** करण्याच्या प्रयोजनार्थ, राज्य शासनाने अधिसूचित केलेला अधिकारी, संहितेच्या कलम ११४ च्या पोट-कलम (१) अन्वये

प्रशमन करण्यायोग्य असलेल्या अपराधांचे **प्रशमन** करणारी नोटीस इलेक्ट्रॉनिक पद्धतीने निर्गमित करील.

(२) अशा प्रकारे नोटीस दिलेल्या व्यक्तीस, नोटीस मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत, **प्रशमन** करणाऱ्या अधिकाऱ्याकडे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने अर्ज करता येईल आणि **प्रशमन**ची संपूर्ण रक्कम, इलेक्ट्रॉनिक हस्तांतरणाद्वारे किंवा अन्य प्रकारे जमा करता येईल.

(३) **प्रशमन** करणारा अधिकारी, ज्या व्यक्तीकडून **प्रशमन**च्या नोटीसीच्या प्रतिसादार्थ अशी रक्कम प्राप्त झाली आहे अशा व्यक्तीस, **प्रशमन**ची रक्कम मिळाल्यापासून दहा कामाच्या दिवसांच्या आत, **प्रशमन** प्रमाणपत्र देईल.

(४) जर अशी नोटीस दिलेल्या व्यक्तीने, खटला दाखल करण्यापूर्वी एक महिन्याच्या आत **प्रशमन**ची रक्कम जमा करण्यास कसूर केली तर, सक्षम न्यायालयासमोर खटला चालविण्यात येईल.

(५) कलम ११० च्या पोट-कलम (१) च्या परंतुकास आधीन राहून, अशा तरतुदींचे पालन करण्यासाठी आणि कलम ११४ नुसार **प्रशमन** करण्यासाठी नियोक्त्याला संधी दिल्याशिवाय कोणताही खटला दाखल करण्यात येणार नाही.

६९. कलम ११९ अन्वये कंत्राटदार, कारखाने व औद्योगिक परिवास्तू, इत्यादींसाठी सामायिक/ कामाची विशिष्ट अनुज्ञप्ती.-

(१) या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या संहितेखालील कोणतीही व्यक्ती, संहिते अन्वये कारखान्याच्या बाबतीत आस्थापनेसाठी, बिडी व सिगारेट कामाकरिता औद्योगिक परिवास्तूसाठी आणि कंत्राटी कामगार कामावर ठेवण्याकरिता (कंत्राटदार) सामायिक अनुज्ञप्ती मिळवू इच्छिणारी

कोणतीही व्यक्ती, शासनाने उक्त गोष्टींसाठी अधिसूचनेद्वारे नेमून दिलेल्या प्राधिकाऱ्याकडे अर्ज करील.

(२) पोट-नियम (१) खालील सामायिक अनुज्ञप्तीचा अर्ज, **नमुना-चौदा** मध्ये करील आणि त्या सोबत, कंत्राटदारासाठी नियम २८(२) खालील तक्त्यामध्ये, आस्थापनेसाठी या नियमान्वये कारखाना नियमान्वये कारखान्याकरिता अनुसूची दोन मध्ये बिडी व सिगारेट कामाकरिता औद्योगिक परिवास्तुसाठी नियम ४३(१) खालील तक्त्यामध्ये आणि कारखाना नियमाखालील कारखान्यांसाठी नियम अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या तक्त्यामध्ये, विनिर्दिष्ट केलेले एकूण शुल्क प्रदान करील:

(३) पोट-नियम (१) खालील अर्ज प्राप्त झाल्यावर, प्राधिकारी त्याची छाननी करील.

(४) प्राधिकार्याची, कारखाना, बिडी व सिगारेट कामाच्या औद्योगिक परिवास्तू यांच्या बाबतीत आणि कंत्राटी कामगार कामावर ठेवण्याकरिता (कंत्राटदार) सामायिक अनुज्ञप्ती देण्यात यावी याबाबत खात्री पटली असेल तेव्हा, असा प्राधिकारी, अर्ज प्राप्त झाल्याच्या तारखेपासून तीस कामाच्या दिवसांच्या आत, **नमुना-सतरा** मध्ये अशी सामायिक/ कार्य विशिष्ट अनुज्ञप्ती देईल, अशी अनुज्ञप्ती ती दिल्यापासून पाच कॅलेंडर वर्षाच्या कालावधीकरिता वैध असेल.

(५) या नियमांखाली अनुज्ञप्ती देणाऱ्या प्राधिकाऱ्याने दिलेल्या आदेशामुळे व्यथित झालेली कोणतेही व्यक्ती, आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, संबंधित अधिकारक्षेत्राकरिता असणाऱ्या कामगार विभागाच्या विभागीय अपर कामगार आयुक्त किंवा विभागीय कामगार उपआयुक्त अपील प्राधिकाऱ्यासमोर, अपील दाखल करू शकते. अशा अपिलाकरिता अर्ज इलेक्ट्रॉनिक पद्धतीने भरलेल्या एक हजार रुपये फक्त इतक्या शुल्कासह नमुना बावीसमध्ये दाखल करील. असे अपील दाखल केल्यापासून तीस कामाच्या दिवसांच्या आत इलेक्ट्रॉनिक पद्धतीने अपील निकाली काढण्यात येईल.

प्रकरण - चौदा

संकीर्ण

७०. कंत्राटी कामगारांसाठी तक्रार निवारण यंत्रणा : १. कंत्राटी कामगारास आरोग्य, कामाच्या अटी व वेतन यांसंबंधी तक्रारी असल्यास, तो त्या मुख्य नियोक्त्याच्या स्तरावर सादर करील, जो त्या बाबींची दखल घेईल व तक्रारीचे निवारण करील.

२. अध्यक्षाचा समावेश असणारी एक समिती स्थापन केली जाईल, जो मुख्य नियोक्त्याचा अधिकृत प्रतिनिधी असेल. या समितीत मुख्य नियोक्ता व कंत्राटदार यांचे प्रतिनिधी असतील. उपरोक्त समिती कंत्राटी कामगारांच्या तक्रारी ऐकून घेईल आणि त्या एक महिन्याच्या कालावधीत निकाली काढील.

३. जर तक्रार सादर केल्यापासून एका महिन्याच्या आत निवारण झाले नाही, तर मुख्य नियोक्ता ती तक्रार संबंधित निरीक्षक-सह-सुविधाकारकडे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने किंवा नोंदणीकृत टपालाने अथवा शीघ्र टपालाने पाठवील.

७१. कंत्राटदाराच्या नियमित कामगाराची वार्षिक वेतनवाढ : ज्या कामगाराला कोणत्याही कामासाठी कंत्राटदाराने नियमितपणे कामावर ठेवले आहे आणि त्याच्या परस्पर मान्य करण्यात आलेल्या सेवा अटींनुसार नियंत्रित असल्यास, त्यास त्याच्या वेतनाच्या किमान २ टक्के इतकी वार्षिक वेतनवाढ मिळेल.

नमुना-एक

(नियम ३ पहा)

विद्यमान आस्थापनांच्या /नवीन आस्थापनांच्या नोंदणीसाठी/नोंदणी प्रमाणपत्रात सुधारणा करण्यासाठी अर्ज

अ. आस्थापनेचा तपशील:-

१. कामगार ओळख क्रमांका मार्फत (एल.आय.एन.) आस्थापनेचे तपशील पुनर्रप्राप्त करा:

२. आस्थापनेचे नाव:

३. आस्थापनेचे स्थान वटपालाचा पत्ता:

४. आस्थापनेत केल्या जाणाऱ्या कामाचे स्वरूप:

५. आस्थापनेचा इतर तपशील:

क.आस्थापनेत थेटपणे कार्यरत असलेल्या कायम स्वरूपी कामगारांची व कर्मचा-यांची एकूण संख्या:

ख. काम करीत असलेल्या कंत्राटी कामगारांची एकूण संख्या:

ग. काम करीत असलेल्या आंतर-राज्यीय स्थलांतरित कामगारांची एकूण संख्या:

६. (क) इमारत व इतर बांधकाम कामासाठी:-

बांधकामाचा प्रकार	काम सुरू होण्याचा संभाव्य कालावधी	कामपूर्ण होण्याचा अपेक्षित कालावधी	स्थानिक प्राधिकरणाच्या मान्यतेचा तपशील
१	२	३	४

६.(ख) मोटार वाहतूक उपक्रमासाठी:-

वाहतूक उपक्रमाचा टपालाचा पत्ता	भोगवट दाराचे व व्यवस्थापकाचे नाव व पत्ता	वाहनांची संख्या व वाहनांचे प्रकार	वाहनांचा नोंदणी क्रमांक	कर्मचाऱ्यांची व कायमस्वरूपी कामगारांची संख्या	वाहन चालकांची व त्याच्या सहायकाची व इतरांची संख्या
१	२	३	४	५	६

६ (ग) आंतर-राज्यीय स्थलांतरित कामगारांसाठी:-

कंत्राटदाराचे नाव व पत्ता	कंत्राटदाराचा ई-मेल पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक	स्थलांतरित कामगार काम करीत असलेल्या कामाचे स्वरूप	काम करीत असलेल्या स्थलांतरित कामगारांची संख्या पुरुष/ स्त्री				काम सुरू करण्याची तारीख	काम पूर्ण होण्याची संभाव्य तारीख
१	२	३	४				५	६
			पुरुष	स्त्री	इतर	एकूण		

(६) (घ) रोपमळ्याच्या नोंदणीसाठी :

रोप मळा	ज्यांना रोपमळा पाठवावयाचा आहे, त्यांच्याशी संबंधित संपर्काचा संपूर्ण पत्ता	रोपमळ्याची एकूण हेक्टर मध्ये मंजुरी	मागील कॅलेंडर वर्षात कोणत्याही दिवशी कामावर असलेल्या कामगारांची कमाल संख्या	कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये रोपमळा नोंदणीकृत नसल्यास रोपमळ्याच्या मालकाचे आणि भागीदाराचे संपूर्ण नाव आणि निवासी पत्ता	कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये कंपनी नोंदणीकृत नसल्यास, संचालकाचे संपूर्ण नाव आणि निवासी पत्ता	सार्वजनिक क्षेत्र रोपमळ्याच्या मुख्य कार्याधिकाऱ्याच्या किंवा महाव्यवस्थापकाचे संपूर्ण नाव आणि पत्ता	प्रदान केलेल्या शुल्काची रक्कम आणि दिनांक

१	२	३	४				५	६	७	८
			कायम स्वरूपी	तात्पुरते	नैमित्तिक	एकूण				

ब. नियोक्त्याचा तपशील:-

१. नियोक्त्याचे /भोगवटादाराचे /मालकाचे /संचालकाचे/

एजंटाचे /मुख्यकार्यकारी अधिकाऱ्याचे /भागीदारांचे नाव व पत्ता:

२. पदनाम:

(भोगवटादार/मालक/संचालक/ अभिकर्ता /मुख्य कार्यकारी अधिकारी / भागीदार)

३. नियोक्त्याच्या वडिलांचे / पतीचे नाव:

४. ई-मेल, पत्ता, दूरध्वनी व भ्रमणध्वनी क्रमांक:

क. व्यवस्थापकाचा/अभिकर्त्याचा तपशील:-

१.व्यवस्थापकाचे/ अभिकर्त्याचे किंवा आस्थापनेचे पर्यवेक्षण व नियंत्रण करण्यासाठी जबाबदार असलेल्या व्यक्तीचे संपूर्ण नाव व पत्ता:

२. व्यवस्थापकाचा/ एजंटचा पत्ता:

३. ई-मेल पत्ता, दूरध्वनी व भ्रमणध्वनी क्रमांक:

ड. कंत्राटदाराचा तपशील:-

कंत्राटदाराचे नाव व पत्ता	कंत्राटदाराचा ई-मेल पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक	कंत्राटी कामगार काम करीत असलेल्या कामाचे स्वरूप	प्रत्येक कंत्राटदारामार्फत कोणत्याही दिवशी नियुक्त करणे अपेक्षित असलेल्या कंत्राटी कामगारांची कमाल संख्या	काम सुरू होण्याची तारीख	काम पूर्ण होण्याची तारीख
१	२	३	४	५	६

इ. इतर तपशील :-

मी, याद्वारे, असे घोषित कर तो की, वर दिलेला तपशील माझ्या माहिती प्रमाणे व विश्वासाप्रमाणे खरा आहे.

दिनांक :

ठिकाण:

नियोक्त्याची स्वाक्षरी/

ई-स्वाक्षरी/ डिजिटल स्वाक्षरी.

नमुना - दोन

(नियम ३ (३) (एक) पहा)

आस्थापनेचे नोंदणी प्रमाणपत्र

नोंदणी क्रमांक:

दिनांक:

व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कामाची स्थिती संहिता, २०२० याच्या कलम ३ च्या पोट-कलम (१) आणि त्या खाली केलेले नियमया अन्वये पुढील तपशील अंतर्भूत असणारे नोंदणी प्रमाणपत्र, याद्वारे, देण्यात येत आहे:-

----------(आस्थापनेचे नाव व पत्ता)

१. आस्थापनेमध्ये केल्या जाणाऱ्या कामाचे स्वरूप (कृपया ✓ चिन्हांकित करा)

(क) मोटार वाहतूक उपक्रम:

(ख) कंत्राटी काम:

(ग) इमारत व इतर बांधकाम काम:

(घ) रोपमळा:

(ङ) अन्य कोणतेही काम (वर समाविष्ट नसलेले):

२. आस्थापनेचा तपशील:

एक. आस्थापनेत थेट नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांची एकूण संख्या:

दोन. कंत्राटदारामार्फत काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांची एकूण संख्या:

तीन. कंत्राटदारांची एकूण संख्या व त्यांचा तपशील:

कंत्राटदाराचे नाव व पत्ता	कंत्राटदारा चा ई-मेल पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक	कंत्राटी कामगार काम करीत असलेल्या कामाचे स्वरूप	प्रत्येक कंत्राट दारामर्फत कोणत्याही दिवशी नियुक्त करणे अपेक्षित असलेल्या कंत्राटी कामगारांची कमाल संख्या	काम सुरू होण्याची तारीख	काम पूर्ण होण्याची तारीख
१	२	३	४	५	६

चार. काम करीत असलेल्या आंतर-राज्यीय स्थलांतरित कामगारांची संख्या:

३.(क) इमारत व इतर बांधकाम कामासाठी:-

बांधकाम कामाचा प्रकार	काम सुरू करण्याचा संभाव्य कालावधी	काम पूर्ण होण्याचा अपेक्षित कालावधी	स्थानिक प्राधिकरणाच्या मान्यतेचा तपशील
१	२	३	४

(ख) मोटार वाहतूक उपक्रमासाठी:-

वाहतूक उपक्रमाचा टपालाचा पत्ता	भोगवटदाराचे व व्यवस्थापकाचे नाव व पत्ता	वाहनांची संख्या व वाहनांचे प्रकार	वाहनांचा नोंदणी क्रमांक	कर्मचाऱ्यांची व कायम स्वरूपी कामगारांची संख्या	वाहन चालकांची व स्वच्छकांची आणि इतर कर्मचाऱ्यांची संख्या
१	२	३	४	५	६

(ग) आंतर-राज्यीय स्थलांतरित कामगारांसाठी:-

आस्थापनेत केल्या जाणाऱ्या कामाचे स्वरूप	कंत्राटदारांची नावे व पत्ते	स्थलांतरित कामगार नियुक्त करण्यात आले असतील किंवा नियुक्त करण्यात येणार असतील तर, कामाचे स्वरूप	प्रत्येक कंत्राटदारामार्फत कोणत्याही दिवशी नियुक्त करणे अपेक्षित असलेल्या स्थलांतरित कामगारांची कमाल संख्या	स्थलांतरीत कामगारांची काम पूर्ण होण्याची अंदाजित अथवा संभाव्य तारीख

(घ) रोपमळ्यासाठी:

अ.क्र	रोप मळ्याचे नाव	ज्यांना रोपमळा पाठवायचा आहे त्यांच्याशी संबंधित संपर्काचा संपूर्ण पत्ता	रोपमळ्याची एकूण हेक्टर मध्ये मंजुरी	मागील कॅलेंडर वर्षात कोणत्याही दिवशी कामावर असलेल्या कामगारांची कमाल संख्या	कंपनी अधिनियम १९५६ अन्वये रोप मळा नोंदणीकृत नसल्यास, रोपमळ्याच्या मालकाचे आणि भागीदारांचे संपूर्ण नाव आणि निवासी पत्ता	कंपनी अधिनियम १९५६ अन्वये रोप मळा नोंदणीकृत नसल्यास, संचालकाचे संपूर्ण नाव आणि निवासी पत्ता	सार्वजनिक क्षेत्र रोप मळ्याच्या मुख्य कार्याधिकाऱ्यांचे किंवा महाव्यवस्थापकाचे संपूर्ण नाव आणि पत्ता	नोंदणीसाठी अर्जदाराचे संपूर्ण नाव, पदनाम आणि संपूर्ण पत्ता
१	२	३	४	५	६	७	८	९

४. प्रदान केलेल्या नोंदणी शुल्काची रक्कम :------

५. नोंदणी अधिकाऱ्यांचे शेरे :

पदनामा सह नोंदणी अधिकाऱ्यांची स्वाक्षरी / ई-स्वाक्षरी / डिजिटल स्वाक्षरी.

दिनांक :

ठिकाण:

नोंदणीच्या शर्ती

(१) नियम ३ अन्वये निर्गमित केलेले प्रत्येक नोंदणी प्रमाणपत्र पुढील शर्तींच्या अधीन असेल:-

(क) नोंदणी प्रमाणपत्र, अहस्तांतरणीय असेल;

(ख) कोणत्याही दिवशी एखाद्या आस्थापनेमध्ये थेट काम करीत असलेल्या कामगारांची व कंत्राटी कामगारांची संख्या, नोंदणी प्रमाणपत्रामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कमाल संख्येपेक्षा अधिक असणार नाही; आणि

(ग) या नियमांमध्ये तरतूद केली असेल ते खेरीज करून, नोंदणीप्रमाणपत्र देण्यासाठी प्रदान केलेले शुल्क ना-परतावा असेल.

(२) नियोक्ता, कामगारांच्या संख्येतील किंवा कामाच्या स्वरूपात कोणतेही बदल,तीस दिवसांच्या आत नोंदणी अधिका-याला कळवील.

(३) नियोक्ता, काम सुरू केल्याचे किंवा पूर्ण केल्याचे तारखेपासून तीस दिवसांच्या आत, जेथे प्रस्तावित आस्थापना आहे,किंवा यथास्थिती, काम करावयाचे आहे त्या क्षेत्राकरिता अधिकारिता असणाऱ्या निरीक्षक-नि-सुविधाकारास आणि नोंदणी अधिकाऱ्यास काम सुरू केल्याची किंवा काम पूर्ण केल्याची तारीख, या नियमांस जोडलेल्या **नमुना-चार** मध्ये इलेक्ट्रॉनिक स्वरुपात कळवील.

(४) नोंदणी प्रमाणपत्राची एकप्रत, जेथे काम केले जात आहे तेथील दर्शनिय ठिकाणी लावण्यात येईल.

(५) नियोक्ता, कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ करण्यास (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम, २०१३ अन्वये, त्याच्या आस्थापनेत लैंगिक छळवणुकी बाबत अंतर्गत तक्रार निवारण समिती स्थापन करील.

नमुना -तीन

(नियम ३ (९) पहा)

आस्थापनेची नोंदवही

(मोटार वाहतूक उपक्रम/इमारत व इतर बांधकाम / कंत्राटीकाम/ आंतर-राज्यीय स्थलांतरित कामगारांचे काम/ अन्य कोणतेही काम (वर समाविष्ट नसलेले))

अ. क्र.	नोंदणी केलेल्या आस्थापनेचे नाव, पत्ता व स्थान	नियोक्त्याचे नाव, पत्ता व संपर्काचा तपशील	नोंदणी क्रमांक व नोंदणीचा दिनांक	कामाचे स्वरूप	कायम स्वरूपी कामगारांची एकूण संख्या				कंत्राटी कामगारांची एकूण संख्या				शेरे
१	२	३	४	५	६				७				८
					पुरुष	स्त्री	इतर	एकूण	पुरुष	स्त्री	इतर	एकूण	

नमुना-चार

(नियम ४ पहा)

आस्थापनेचे काम सुरू केल्याची / काम बंद केल्याची सूचना

१. नोंदणी क्रमांक:

२. आस्थापनेचे नाव व पत्ता:

३. नियोक्त्याचे नाव व पदनाम (आस्थापनेच्या कारभारावर ज्याचे अंतिम नियंत्रण आहे तो):

४. आस्थापनेचा ई-मेल:

५. आस्थापनेच्या कामाचे स्वरूप :

६. कार्य आदेशानुसार काम सुरू करण्याची तारीख व कामपूर्ण करण्याचा कालावधी:

७. काम पूर्ण झाल्याच्या बाबतीत/आस्थापना बंद करण्याच्या बाबतीत, काम पूर्ण झाल्याची/ बंद करण्याची तारीख:

मी/आम्ही,याद्वारे असे सूचित करतो की, नोंदणी क्र.----------, तारीख--------- असलेल्या आस्थापनेचे काम, दिनांक-------- रोजी सुरू करण्याचे संभावित असून ते दिनांक--------पर्यंत पूर्ण करण्याचे संभावित आहे.

काम बंद करण्याच्या बाबतीत:

मी/आम्ही, याद्वारे, असे प्रमाणित करतो की, आस्थापनेत काम करीत असलेल्या कामगारांची सर्व देणी प्रदान करण्यात आलेली आहेत आणि परिवास्तु साठवणुकीपासून मुक्त ठेवण्यात आलेली आहे.

नियोक्त्याची स्वाक्षरी व आस्थापनेचा शिक्का.

प्रति,
(१) नोंदणी प्राधिकारी
(२) निरीक्षक- नि- सुविधाकार

नमुना-पाच

(नियम ५ पहा)

पुढील प्रपत्रानुसार अर्हता पात्र वैद्यकीय व्यावसायिका कडून वैद्यकीय तपासणी करण्यात येईल:

वार्षिक वैद्यकीय तपासणी अहवाल

आस्थापनेचे नाव व पत्ता:

आस्थापनेचा प्रकार :

नियुक्तीची तारीख:

शेवटच्या वैद्यकीय तपासणीची तारीख:

वैद्यकीय तपासणीची तारीख :

भाग-अ (अनुक्रमांक १-११): कामगाराने भरावयाचे:

१. कामगाराचे नाव

२. लिंग

३. वय (जन्मतारखेसह)

४. पदनाम

५. सार्वत्रिक लेखा क्रमांक (UAN)

६. प्रभारी व्यवस्थापक

७. वैयक्तिक पूर्ण पत्ता

८. भ्रमणध्वनी क्रमांक/ दूरध्वनी क्रमांक

९. ई-मेल (उपलब्ध असल्यास)

१०. वैद्यकीय आजारपण (सध्याचे) आणि उपचार व औषधोपचार (कोणतेही असल्यास)

११. कामाचे स्वरूप (काम धोकादायक आणि संबंधित असल्यास अधिक तपशील द्या, उदा. शारीरिक, रासायनिक, जैविक, एर्गोनॉमिक, इत्यादी)

दिनांक:-

कर्मचाऱ्याची स्वाक्षरी

भाग - ब:

१२. करण्यात आलेल्या वैद्यकीय चाचण्या आणि त्यांचे अहवाल जोडपत्र म्हणून जोडावेत.

अर्हताप्राप्त वैद्यकीय व्यावसायिकाचा खालील चाचण्यांबाबतचा अन्वयार्थ / मत (केवळ अपसामान्य चाचणी अहवाल असल्यास निर्देशित करावे) :

क. उंची, वजन, छाती, कमरेचा घेर, शरीर वस्तुमान निर्देशांक :

ख. रक्तगट :

ग. दृष्टी (नेत्रतज्ज्ञांच्या चाचण्या):

एक. उजव्या आणि डाव्या दोन्ही डोळ्यांची दृष्टितीक्ष्णता

दोन. रंगदृष्टी

घ. रक्तदाब :

ङ. संपूर्ण रक्त गणना :

च. रक्तातील साखरेचे प्रमाण (उपाशीपोटी / जेवणानंतर (PPBS) / HbA१c):

छ. SpO२ :

ज. रक्तातील युरिया नायट्रोजन (BUN):

झ. यकृत कार्य चाचणी (LFT) / SGOT / SGPT:

ञ. लिपिड प्रोफाईल :

ट. जीवनसत्त्व डी (Vit D), बी१२ (B१२):

ठ. ईएसआर (ESR):

ड. थायरॉईड प्रोफाईल :

ढ. छातीचा एक्स-रे :

ण. ईसीजी (ECG):

त. कर्करोग निर्देशक :

थ. एचआयव्ही निर्देशक :

द. इतर कोणतीही असल्यास:

१३. व्यक्तीला झटके येण्याशी संबंधित आजार आहेत का किंवा उंचावर काम करण्यास अडचणी आहेत का? होय असल्यास, टाळावयाच्या कामांचे स्पष्टीकरण द्या: होय / नाही / लागू नाही

१४. अंतिम अहवाल

उपचार / सल्ला	
सर्वसाधारण अभिप्राय	

अर्हताप्राप्त वैद्यकीय व्यावसायिकाची स्वाक्षरी	
अर्हताप्राप्त वैद्यकीय व्यावसायिकाचे नाव	
अर्हताप्राप्त वैद्यकीय व्यावसायिकाचा नोंदणी क्रमांक	

टीप: अर्जदार आणि तपासणी करणारे वैद्यक यांच्यामधील वरील सर्व माहिती अत्यंत गोपनीय आहे. वरील माहिती नियोक्ता किंवा इतर कोणत्याही यंत्रणेला/व्यक्तींना सामायिक करण्यास केवळ अर्जदार/कर्मचाऱ्याची संमती (Consent) मिळाल्यावरच परवानगी आहे.

नमुना - सहा

(नियम ५ पहा)

पुढील प्रपत्रानुसार वैद्यकीय अधिकाऱ्याकडून वैद्यकीय तपासणीची पडताळणी करण्यात येईल:

(कर्मचाऱ्यांची रोजगारपूर्व / नियतकालिक आरोग्य तपासणी)

आस्थापनेचे नाव व पत्ता :

आस्थापनेचा प्रकार :

कर्मचाऱ्याचे नाव :

कर्मचाऱ्याच्या नियुक्तीची दिनांक :

मागील वैद्यकीय तपासणीची दिनांक :

अर्हताप्राप्त वैद्यकीय व्यावसायिकाकडून वैद्यकीय तपासणी केल्याची दिनांक :

अर्हताप्राप्त वैद्यकीय व्यावसायिकाकडून करण्यात आलेल्या वैद्यकीय चाचण्या आणि त्यांचे अहवाल जोडपत्र म्हणून जोडावेत.

खालील चाचण्यांबाबतचा वैद्यकीय अधिकाऱ्याचा अन्वयार्थ / मत (केवळ अपसामान्य चाचणी अहवाल असल्यास निर्देशित करावे) :

क. उंची, वजन, छाती, कमरेचा घेर, शरीर वस्तुमान निर्देशांक :

ख. रक्तगट :

ग. दृष्टी (नेत्रतज्ज्ञांच्या चाचण्या):

एक. उजव्या आणि डाव्या दोन्ही डोळ्यांची दृष्टितीक्ष्णता

दोन. रंग दृष्टी

घ. रक्तदाब

ङ. संपूर्ण रक्त गणना :

च. रक्तातील साखरेचे प्रमाण (उपाशीपोटी / जेवणानंतर (PPBS) / HbA१c):

छ. SpO२:

ज. रक्तातील युरिया नायट्रोजन (BUN):

झ. यकृत कार्य चाचणी (LFT) / SGOT / SGPT:

ञ. लिपिड प्रोफाईल :

ट. जीवनसत्त्व डी (Vit D), बी१२ (B१२):

ठ. ईएसआर (ESR):

ड. थायरॉईड प्रोफाईल :

ढ. छातीचा एक्स-रे :

ण. ईसीजी (ECG):

त. कर्करोग निर्देशक :

थ. एचआयव्ही निर्देशक :

द. इतर कोणतीही असल्यास:

अंतिम अहवाल

उपचार / सल्ला	
सर्वसाधारण अभिप्राय	
अर्हताप्राप्त वैद्यकीय व्यावसायिकाची स्वाक्षरी	
अर्हताप्राप्त वैद्यकीय व्यावसायिकाचे नाव	
अर्हताप्राप्त वैद्यकीय व्यावसायिकाचा नोंदणी क्रमांक	

नमुना- सात

(नियम ६ पहा)

नियुक्ती पत्राचा नमुना

क. कर्मचाऱ्याचे संपूर्ण नाव:

ख. वडिलांचे/ पतीचे नाव:

ग. आधारकार्ड क्रमांक:

घ. आस्थापनेचा कामगार ओळख क्रमांक (LIN):

ङ. सार्वत्रिक खाते क्रमांक (UAN) (भविष्यनिधी क्रमांक):

च. विमा क्रमांक (कामगार राज्यविमा योजना):

छ. पदनाम:

ज. कौशल्याचा प्रवर्ग:

झ. रुजू होण्याचा दिनांक:

ञ. वेतन, मूळवेतन व महागाई भत्ता:

ट. निवास व्यवस्थेसह जे अनुज्ञेय आहे/ आहेत असे इतर भत्ते:

ठ. उच्चवेतन/उच्चस्थान प्राप्त करण्याची संधी:

ड. अनुज्ञेय असलेले सामाजिक सुरक्षा कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना (EPFO) व राज्य कामगार विमा महामंडळ (ESIC) लाभ:

ढ. आरोग्य तपासणी:

ण. पार पाडावयाच्या कर्तव्यांचे सर्वसाधारण स्वरूप:

त. इतर कोणतीही माहिती:

नियोक्त्याची स्वाक्षरी/इ-स्वाक्षरी/डिजिटल स्वाक्षरी.

नमुना-आठ

(नियम ७ पहा)

अपघाताची किंवा प्राणघातक घटनेची सूचना

नियोक्त्याचा कामगार राज्य विमा योजना संकेत क्रमांक:

जखमी झालेल्या व्यक्तीचा कामगार राज्य विमा योजना विमा क्रमांक:

मयत झालेल्या जखमी/जखमी झालेल्या व्यक्तींची संख्या:

१. नियोक्त्याचे नाव :

२. अपघात घडलेल्या किंवा प्राण घातक घटना घडलेल्या कामाच्या ठिकाणाचा /परिवास्तूचा पत्ता:

३. उद्योगाचे स्वरूप व आस्थापनेचा कामगार ओळख क्रमांक (LIN):

४. अपघात घडलेले किंवा प्राणघातक घटना घडलेले नेमके ठिकाण:

५. मयत झालेल्या/ जखमी झालेल्या व्यक्तीचे नाव व पत्ता:

६. (अ) लिंग:

(ब) वय (शेवटच्या वाढदिवसाचे वेळी):

(क) मयत झालेल्या/ जखमी झालेल्या व्यक्तीचा व्यवसाय:

७. प्रथम खबर अहवाल (एफआयआर):----------, तारीख:----------,क्रमांक----------,पोलीस ठाणे: ----------

८. मयत व्यक्ती/ जखमी झालेली व्यक्ती ज्या स्थानिक राज्य कामगार विमा महामंडळ (E.S.I.C.) कार्यालयाशी संलग्न आहे ते कार्यालय:

९. अपघाताची किंवा प्राणघातक घटनेची तारीख, पाळी व वेळ:

१०.(क) अपघात किंवा प्राणघातक घटना घडण्याच्या दिवशी जखमी झालेल्या व्यक्तीने सुरू केलेल्या कामाची वेळ:

(ख) अपघाताच्या किंवा प्राणघातक घटनेच्या दिवशी त्याला प्रदेय असलेले पूर्ण किंवा अंशतः वेतन दिले आहे किंवा कसे:

११. (क) अपघाताचे किंवा प्राणघातक घटनेचे कारण किंवा स्वरूप:

जर अपघात किंवा प्राणघातक घटना यंत्रामुळे घडली असेल तर,-

(एक) अपघात किंवा प्राणघातक घटना घडवणाऱ्या यंत्राचे व भागाचे नाव द्या :

(दोन) अपघाताच्या किंवा प्राणघातक घटनेच्या वेळी ते, यांत्रिक शक्तीने चालवले जात होते किंवा कसे:

(ख) अपघाताच्या किंवा प्राणघातक घटनेच्या वेळी मयत व्यक्ती/जखमी व्यक्ती नेमके काय करीत होती ते सांगा:

(ग) तुमच्या मते, अपघाताच्या किंवा प्राणघातक घटनेच्या वेळी मयत व्यक्ती/ जखमी व्यक्ती, -

(एक) तिला लागू असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींचे उल्लंघन करत होती; किंवा

(दोन) तिच्या नियोक्त्याने किंवा त्याच्या वतीने दिलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन करून काम करीत होती; किंवा

(तीन) तिच्या नियोक्त्याच्या सूचनांशिवाय काम करीत होती किंवा कसे?

(घ) अपघात अटळ होता किंवा कसे?

(ङ) जर (घ) (एक), (दोन) किंवा (तीन) चे उत्तर होकारार्थी असेल तर, हे काम नियोक्ताच्या व्यापार किंवा धंद्याच्या प्रयोजनार्थ व त्या संबंधात केले होते किंवा कसे, ते सांगा.

१२. जर नियोक्ताच्या वाहतुकीच्या साधनाने प्रवास करीत असताना अपघात किंवा प्राणघातक घटना घडलेली असल्यास,-

(क) जखमी/मयतव्यक्ती, प्रवासी म्हणून तिच्या कामाच्या ठिकाणा कडे किंवा कामाच्या ठिकाणा पासून प्रवास करीत होती :

(ख) जखमी/मयतव्यक्ती, तिच्या नियोक्त्याच्या स्पष्ट किंवा गर्भित परवानगीने प्रवास करीत होती :

(ग) नियोक्त्याद्वारे किंवा त्याच्या वतीने अथवा नियोक्त्याने केलेल्या प्रवासी व्यवस्थेच्या अनुषंगाने ज्याने ती पुरवलेली आहे अशा इतर कोणत्याही व्यक्तीद्वारे वाहतूक केली जात आहे; आणि:

(घ) सार्वजनिक परिवहन सेवेच्या सर्वसाधारण प्रक्रियेत वाहन चालवले जात होते / नव्हते, किंवा कसे.

१३. आपत्कालीन परिस्थिती हाताळताना अपघात किंवा प्राणघातक घटना घडलेली असल्यास,-

(क) तिचे स्वरूप; आणि

(ख) अपघात किंवा प्राणघातक घटना घडली त्यावेळी मयत/जखमी व्यक्ती तिच्या नियोक्त्याच्या व्यापाराच्या किंवा धंद्याच्या प्रयोजनार्थ ज्या परिवास्तूत अपघात किंवा प्राणघातक घटना घडली त्या ठिकाणी काम करीत होती किंवा कसे ते स्पष्ट करा.

१४. अपघात किंवा प्राणघातक घटना कशी घडली त्याचे संक्षिप्त वर्णन करा:

१५. साक्षीदारांची नावे व पत्ते :

(१)----------

(२)----------

१६. (क) दु:खापतीचे स्वरूप व व्याप्ती (उदा. प्राणघातक, बोटंगमावणे, पायाची हाडे मोडणे, भाजणे, छोट्या जखमेचे रुपांतर मोठ्या जखमेत होणे, इत्यादी.)

(ख) दु:खापतीची शारिरिक जागा (उदा.उजवापाय, डावाहात, डावाडोळा, इत्यादी.)

१७. जिवित हानीच्या अपघाताच्या बाबतीत,-

(क) जेथे कामगार मयत झाल्याचे घोषित केले होते त्या रुग्णालया चे नाव:

(ख) मृत्यू प्रमाणपत्राचा क्रमांक व दिनांक:

(ग) संबंधित राज्य कामगार विमा महामंडळ (E.S.I.C.) प्राधिकरणास कळविल्याची तारीख:

(घ) संबंधित कर्मचारी नुकसान भरपाई आयुक्तास कळविल्याची तारीख:

१८. (क) जर अपघात किंवा प्राणघातक घटनेत जिवितहानी झाली नसल्यास जखमी व्यक्ती ४८ तासांपेक्षा अधिककाळ काम करण्यास असमर्थ झाली होती किंवा कसे ते स्पष्ट करा.

(ख) कामावर परतल्याची तारीख व वेळ:

(ग) संबंधित राज्य कामगार विमा महामंडळ (E.S.I.C.) प्राधिकरणास कळविल्याची तारीख:

(घ) संबंधित कर्मचारी नुकसान भरपाई आयुक्तास कळविल्याची तारीख:

१९. (क) ज्यांच्याकडून किंवा ज्याने जखमी व्यक्तीवर उपचार करण्यात आले होते/ उपचार केले आहे त्या वैद्यकीय अधिकाऱ्याचा, दवाखान्याचा किंवा रुग्णालयाचा तपशिल.

(ख) जखमी व्यक्तीने निवडलेल्या दवाखान्याचे/ पॅनलवरील/नामफलकावरील निर्देशित डॉक्टरचे नाव:

२०. (क) जखमी व्यक्तीचा मृत्यू झाला आहे का? :

(ख) झाला असल्यास, मृत्यूची तारीख:

मी असे प्रमाणित करतो की, वरील तपशील माझ्या माहिती प्रमाणे व विश्वासाप्रमाणे, सर्व बाबतीत अचूक आहे.

अहवाल पाठवल्याची तारीख:

ठिकाण:

मालकाची/ नियोक्त्याची/व्यवस्थापकाची/

अभिकर्त्याची सही व नाव आणि पदनाम.

नमुना- नऊ

(नियम १६ पहा)

कामाच्या कालावधीची सूचना

आस्थापनेचे नाव:----------, ठिकाण:---------

----------,जिल्हा:---------

कार्य, गटांचा कालावधी पाळ्यांचा तपशील	पुरुष												महिला												इतर												गटाचे वर्णन ,कामाचे स्वरूप	शेरे
	काम करीत असलेल्या पुरुषांची एकूण संख्या												काम करीत असलेल्या स्त्रियांची एकूण संख्या												काम करीत असलेल्या इतरांची एकूण संख्या													
	साधारण पाळी			पहिली पाळी			दुसरी पाळी			तिसरी पाळी			साधारण पाळी			पहिली पाळी			दुसरी पाळी			तिसरी पाळी			साधारण पाळी			पहिली पाळी			दुसरी पाळी			तिसरी पाळी				
	१	२	३	१	२	३	१	२	३	१	२	३	१	२	३	१	२	३	१	२	३	१	२	३	१	२	३	१	२	३	१	२	३	१	२	३		

कामाच्या दिवसांवरून पासून.....पर्यंत.....

पासून.....पर्यंत.....

पासून.....पर्यंत.....

कामाच्या आंशिक दिवसांवरून

पासून.....पर्यंत.....

पासून.....पर्यंत.....

ज्या तारखेला ही नोटीस प्रथम प्रदर्शित करण्यात आली आहे ती तारीख:

व्यवस्थापकाची किंवा अभिकर्त्याची सही.

तारीख:

नमुना - दहा

[(नियम १७ पहा)]

कर्मचारी नोंदवही

(इतर बाबींबरोबरच खालील तपशिलासह नोंदवही इलेक्ट्रॉनिक स्वरूपात देखील ठेवली जाऊ शकते.)

आस्थापनेचे नाव:	
नियोक्त्याचे / मालकाचे नाव:	
कामगार ओळख क्रमांक (LIN) / आस्थापनेचा नोंदणी क्रमांक:	
आस्थापनेच्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी ठेवावयाचा तपशील:	
१. कर्मचारी सांकेतांक	
२. नाव	
३. आडनाव	
४. लिंग	
५. वडिलांचे / पती/पत्नीचे नाव	
६. जन्म दिनांक	
७. जन्म ठिकाण	
८. राष्ट्रीयत्व	
९. शैक्षणिक स्तर	

१०. रुजू झाल्याची तारीख	
११. पदनाम	
१२. प्रवर्ग (अकुशल, अर्ध-कुशल, कुशल किंवा अति-कुशल)	
१३. कर्मचाऱ्याचा / कामगाराचा प्रकार	
१४. भ्रमणध्वनी क्रमांक	
१५. सार्वत्रिक खाते क्रमांक(UAN)	
१६. पॅन	
१७. पीपीएफ क्रमांक	
१८. नामनिर्देशित	
१९. ईपीएस / एनपीएस (EPS/NPS)	
२०. कुटुंबाचा तपशील	
२१. पदस्थापनेचा तपशील	
२२. वेतनश्रेणी	
२३. पदोन्नती	
२४. ईएसआयसी विमा क्रमांक	
२५. आधार क्रमांक	

२६. बँक खाते क्रमांक	
२७. बँक	
२८. शाखा (IFSC)	
२९. सध्याचा पत्ता	
३०. कायमस्वरूपी पत्ता	
३१. सेवा पुस्तक क्रमांक	
३२. सेवा सोडल्याची दिनांक	
३३. सेवा सोडण्याचे कारण	
३४. ओळख चिन्ह	
३५. छायाचित्र	
३६. नमुना स्वाक्षरी / अंगठ्याचा ठसा	
३७. शेरे	

आस्थापनेचे नाव शिक्का/ नियोक्त्याची स्वाक्षरी.

नमुना - दहा (अ)

[(नियम १७ पहा)]

उपस्थिती नोंदवही-नि-हजेरीपट

(इतर बाबींबरोबरच खालील तपशिलासह उपस्थिती नोंदवही-नि-हजेरीपट इलेक्ट्रॉनिक स्वरूपात देखील ठेवता येईल.)

								..... **महिन्यासाठी**, वर्ष २०.....						
आस्थापनेचे नाव:														
नियोक्त्याचे / मालकाचे नाव:														
कामगार ओळख क्रमांक (LIN) / आस्थापनेचा नोंदणी क्रमांक:														
१.	अनुक्रमांक													
२.	कर्मचारी सांकेतांक													
३.	नाव													
४.	पदनाम													
५.	पाळी किंवा सत्र													
६.	कामाचे ठिकाण / विभाग / शाखा													
७.	आत येण्याची आणि बाहेर जाण्याचा दिनांक व वेळ													
	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५

	१६	१७	१८	१९	२०	२१	२२	२३	२४	२५	२६	२७	२८	२९	३०	३१
८.	काम केलेल्या एकूण दिवसांची संख्या															
९.	काम केलेल्या अतिरिक्त तासांची एकूण संख्या															
१०.	कामाच्या ठिकाणाबाहेरील दौरा किंवा नेमणुकीच्या बाबतीत योग्य त्या नोंदी कराव्यात															
११.	नोंदवही परिरक्षकाची (ठेवणाऱ्याची) स्वाक्षरी															

नमुना - दहा (ब)

[(नियम १७ पहा)]

वेतन, अतिकालिक काम आणि वजावटी यांची नोंदवही

(इतर बाबींबरोबरच खालील तपशिलासह नोंदवही इलेक्ट्रॉनिक स्वरूपात देखील ठेवली जाऊ शकते.)

आस्थापनेचे नाव:	
नियोक्त्याचे / मालकाचे नाव:	
कामगार ओळख क्रमांक (LIN) / आस्थापनेचा नोंदणी क्रमांक:	
वेतन कालावधी दिनांक/महिना/वर्ष ते दि/महिना/वर्ष (मासिक / पाक्षिक / साप्ताहिक / दैनिक / उक्त्या दराने	
१. अनुक्रमांक	
२. कर्मचारी सांकेतांक क्रमांक	
३. नाव	
४. पदनाम	
५. वेतनाचा दर	
अ) मूळ वेतन	
ब) महागाई भत्ता	
क) इतर भत्ते	

ड) एकूण	
६. काम केलेल्या दिवसांची संख्या	
